अहवाल क्रमांक : १७१

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## पंचविसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## पंचविसावा अहवाल

# पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
२९. श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

# पंचायती राज समिती
# (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा ‘ समिती प्रमुख ’ या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा पंचविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि, शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर

समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उप केंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठित झालेल्या समितीने वाशिम जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने वाशिम जिल्हा परिषदेस दिनांक १७, १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी भेट देऊन श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठित झालेल्या समितीने वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २ व २२ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा परिषद, वाशिम संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. फु. स. मेश्राम, सहसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. दिनेश डिंगळे, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. सु. नि. गावडे, सहसचिव, वने (भूसंपादन) विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री. विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. अ. प्र. अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या वाशिम जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | पंचायत समिती मानोरा अंतर्गत ९० टक्के रक्कम ताडपत्री खरेदीवर खर्च केल्याबाबत (पं.स.उपकर) | १ |
| (२) | दोन | विहिरीबाबत प्राथम्यक्रम ठरवितांना ईश्वर चिठ्ठी काढणेबाबत | ३ |
| (३) | तीन | जिल्ह्यातील कुपोषित बालकांबाबत | ८ |
| (४) | चार | गजानन महाराज मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील गैरसोयीबाबत | १३ |
| (५) | पाच | जिल्हा परिषदेतील गैरव्यवहाराच्या प्रकरणांबाबत | १६ |
| (६) | सहा | वाशिम जिल्हा परिषदेमध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येणा-या उपाययोजनांसाठी वाढीव निधीची तरतूद करण्यात न आल्याबाबत | १८ |

**परिशिष्ट**

**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त**

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

### पंचायत समिती मानोरा अंतर्गत ९० टक्के रक्कम ताडपत्री खरेदीवर खर्च केल्याबाबत (पं.स.उपकर)

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, सन २०१३-२०१४ मध्ये ताडपत्री पुरवण्याकरिता कशाच्या आधारे खरेदी केल्या आहेत, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, सदरील ताडपत्र्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (एमएसएसआयडीसी) कडून घेतलेल्या आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ताडपत्रीबाबत दर करार केला होता काय, सर्वसाधारण कास्तकारांना १२ लाख ५० हजार रुपयांच्या ताडपत्री पुरविण्यासाठी खरेदी केलेल्या आहेत, याचा दर किती होता, स्थायी समिती व सर्वसाधारण सभेस किती रकमेपर्यंत खरेदी करण्याचे अधिकार आहेत, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही खरेदी सेस फंडातून केली आहे. यातून ७०१ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. २३७६ रुपये अशी एका ताडपत्रीची किंमत आहे. ६ × ६ मीटर ३०० जीएसएम असा या ताडपत्रीचा तपशील आहे. Supply of plastic Tarpaulin made from high density polythene woven fabric with ISI marks is 7903 :2005/2011 size 6m × 6m, 300 GSM, Black color असे महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून घेतलेल्या ताडपत्रीचा तपशील आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मानोरा पंचायत समितीने केवळ ताडपत्रीवर खर्च केलेला आहे, बाकीच्या सर्व योजना ठप्प केल्या आहेत, सर्वसामान्याच्या प्रश्नांकडे पंचायत समितीने दुर्लक्ष केले आहे. ग्रामविकास मंत्री यांनी याबाबत जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले होते. तरीही आपण कामात दिरंगाई केलेली आहे. शिस्तभंगाची कारवाई करावी, असे पत्रात लिहिलेले आहे. जिल्हा परिषदेने यासंदर्भात कोणती कारवाई केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीला आश्वासित केले की, याप्रकरणी तपासून माहिती समितीला देण्यात येईल. समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकाच घरातील ४-४ लोकांना ताडपत्री दिल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच एक सारख्या स्वाक्ष-या केलेल्या असल्याचे दिसून आले आहे. यावर तत्कालिन गटविकास अधिकारी, यांनी समितीस माहिती दिली की, त्यांच्याकडे ८ महिने कार्यभार होता, ४ महिने इतरांकडे कार्यभार होता. या पुरवठा आदेशावर त्यांची स्वाक्षरी नाही. दुस-या कोणाची तरी स्वाक्षरी आहे. विस्तार अधिकारी कृषी श्री.कांबळे यांच्याकडे हा कार्यभार होता, त्यांच्या कार्यकाळातील हे प्रकरण दिसत आहे. यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, समितीला चुकीची माहिती देणे, वेळ वाया घालवणे, समितीची दिशाभूल करणे, अवमान करणे, यामुळे तत्कालिन गटविकास अधिकारी कारवाईस पात्र आहेत. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, सदरील प्रकरण सन २०१३-२०१४ मधील आहे. त्यावेळी दुसरे गट विकास अधिकारी कार्यरत होते. यावर समितीने विचारणा केली की, तत्कालिन गटविकास अधिकारी यांना अगोदरच विचारले पाहिजे होते की, सर्व बजेट तुम्ही केवळ ताडपत्रीवरच का खर्च केले आहे, यावर विद्यमान गट विकास अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले की, या देयकावर तत्कालिन गट विकास अधिकारी श्री. वानखेडे यांची स्वाक्षरी आहे. यावर समितीने निदेश दिले की, त्या कालखंडात सर्व कामे बोगस झालेली दिसत आहेत. एकाच कुटूंबातील ४-४ जणांना लाभ का दिला. सर्वसाधारण सभेने मंजूर केले असले तरी वाटपापूर्वी निकषाप्रमाणे सर्व बाबी गटविकास अधिका-यांनी तपासल्या पाहिजे होत्या. बोगस नोंदवही तयार केलेली दिसत आहे, ह्या स्वाक्ष-यांचे नमुने पडताळणीसाठी पाठविण्यात यावे. सदरील नोंदवही न्यायवैद्यक प्रयोगशाळा (फॉरेन्सिक लॅब) येथे तपासणीकरिता पाठविण्यात यावी. प्रत्यक्ष लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे की नाही हे पहावे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, समाजकल्याण विभागात मागासवर्गीयांना ताडपत्री पुरविण्याकरिता ३,९९,१६८ लाख रूपये खर्च झाला आहे. यामध्ये किती लाभार्थी आहेत व किती दराने ताडपत्री खरेदी केली आहे? यावर गट विकास अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, एमएसएसआयडीसीकडून दर कराराप्रमाणे ताडपत्री खरेदी केलेली आहे. याबाबत समितीने नुकतीच चर्चा केलेली आहे. २३७६ हा प्रती ताडपत्री दर आहे. २२४ लाभार्थी आहेत. यावर समितीने गट विकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने असे निदेश दिले की, पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात पंचायत समिती मानोरा येथील लेख्यांबाबत चर्चा होत असताना कृषी व समाजकल्याण विभागाने सन २०१३-२०१४ मध्ये पंचायत समितीने सुमारे ९० टक्के रक्कम ताडपत्री खरेदीवर खर्च केली आहे. ही बाब गंभीर आहे. शिक्षण, आरोग्य, लघुपाटबंधारे, रस्ते, अपंग कल्याण इत्यादी योजनांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. वाटप नोंदवहीवर स्वाक्ष-या संशयास्पद असून त्यांची तपासणी करणे आवश्यक आहे. एकाच व्यक्तीच्या ४ सह्या दिसत आहेत. एकाच व्यक्तीचे अनेक अंगठ्याचे ठसे मारलेले दिसत आहेत. त्यामुळे समितीला यामध्ये शंका येत आहे. खरेदीची पद्धतदेखील संशयास्पद आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची तात्काळ चौकशी करावी. जबाबदारी निश्चित करून तत्कालिन अधिका-यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्यामुळे या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती मानोरा अंतर्गत समाज कल्याण विभागाने सन २०१३-१४ मध्ये सुमारे ९०% रक्कम ताडपत्री खरेदीवर खर्च केली असुन शिक्षण, आरोग्य, लघुपाटबंधारे, रस्ते, अपंग कल्याण योजना इत्यादी योजनांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. वाटप नोंदवही वरील स्वाक्ष-या, खरेदी पद्धती संशयास्पद आहेत. याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती मानोराचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रक रुपये १८,६०,००० चे होते पैकी महिला व बालकल्याण अंतर्गत सौर कंदील वाटपा करीता १,८६,३९० खर्च करण्यात आले तसेच समाजकल्याण अंतर्गत ताडपत्री खरेदीवर रुपये ३,९९,१६८ इतका खर्च करण्यात आला आणि कृषि विभागा अंतर्गत ताडपत्री खरेदीवर रु. १२,४९,१८२ इतका खर्च करण्यात आला. सदर वर्ष सन २०१३-१४ मध्ये पंचायत समिती मासिक सभा ठराव क्र. ५, दिनांक ९ मे, २०१३ अन्वये सभागृहाने महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत सौर कंदील आणि कृषि व समाजकल्याण विभागा अंतर्गत ताडपत्री वाटपाचा ठराव पारित केल्यामुळे सदर योजना राबविण्यात आली. तसेच अपंग कल्याण निधी अनुशेषासह वर्ष २०१७-१८ मध्ये खर्च करण्यात आला. समाजकल्याण विभागा अंतर्गत वाटप नोंदवहीची तपासणी केली असता नोंदवही वरील स्वाक्ष-या संशयास्पद आढळून येत नाही. तसेच सदर नोंदवहीची लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा यांचे द्वारा तपासणीही करण्यात आल्याचे निर्दशनास येते. त्याचप्रमाणे मा. पंचायती राज समिती यांने साक्षी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यानुसार ताडपत्री वाटपाबाबत नमुना दाखल काही लाभार्थ्यांची चौकशी केली असता, त्यांना ताडपत्री प्राप्त झाल्याचा विस्तार अधिकारी (पंचायत) यांचा अहवाल प्राप्त आहे. पंचायत समिती सभागृहाने सदर आर्थिक वर्षात राबवावयाच्या योजनांचा अंदाजपत्रकात समावेश करून अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानुसार सदर योजनांची नियमानुसार सक्षम अधिकारी यांच्याकडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन शासनाच्या अंगिकृत असलेल्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांना पुरवठा आदेश देऊन नियमानुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर खरेदी प्रक्रियेत वा योजना राबविण्यामध्ये अनियमितता आढळून आली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वाशिम यांच्या अहवालाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने सचिवांनी केलेल्या खुलाशाबाबत व सचिवांनी दिलेले उत्तर बरोबर आहे असे नमुद केले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता, सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान पंचायत समिती मानोरा, अंतर्गत ९० टक्के रक्कम ताडपत्री खरेदीवर खर्च केली आहे. सन २०१३-१४ मध्ये ताडपत्रीची खरेदी सेस फंडातून करण्यात आलेली असून या योजनेद्वारे ७०१ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. एका ताडपत्रीची किंमत रु. २३७६ आहे. सदर ताडपत्रीचा आकार ६ × ६ मीटर, ३०० ग्रॅम प्रती चौरस मीटर (GSM) असून ती जास्त घनतेच्या पॉलिथिन पासून बनविलेली काळ्या रंगाची ताडपत्री आहे. या ताडपत्री महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित या शासनाच्या उपक्रमाकडून खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

शिक्षण, आरोग्य, लघु पाटबंधारे, रस्ते, अपंग कल्याण योजना इत्यादी योजनांवर कमी निधी खर्च झालेला आहे. तसेच वाटप नोंदवही वरील स्वाक्ष-या व खरेदी पद्धती संशयास्पद आहे. एकाच घरातील ४-४ लोकांना ताडपत्री पुरवठा करण्यात आलेला आहे. या आक्षेपावर संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा यांची दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, तत्कालिन गटविकास अधिकारी श्री. वानखेडे यांनी केलेल्या खुलाशानुसार श्री. वानखेडे यांच्याकडे मानोरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून ८ महिने कार्यभार होता व ४ महिने इतरांकडे कार्यभार होता. ताडपत्री पुरवठा आदेशावर श्री. वानखेडे यांची स्वाक्षरी नव्हती, विस्तार अधिकारी (कृषी) श्री. कांबळे यांच्याकडे गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार होता. त्यामुळे श्री. कांबळे यांच्या काळातील हे प्रकरण दिसत आहे असे वानखेडे यांनी नमूद केले. या खुलाशावरुन समितीचे असे स्पष्ट मत आहे की, समितीला चुकीची माहिती देणे, समितीचा वेळ वाया घालविणे, समितीची दिशाभूल करणे, अवमान करणे इत्यादीमुळे तत्कालिन गटविकास अधिकारीच कारवाईस पात्र ठरत आहेत. कारण एकाच कुटुंबातील ४-४ जणांना ताडपत्रीचा पुरवठा करण्यात आला आहे. पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेने ताडपत्री पुरवठ्यासाठी मंजुरी दिली असली तरी वाटपापूर्वी निकषाप्रमाणे सर्व बाबी तत्कालिन गटविकास अधिका-यांनी तपासणे आवश्यक होते.

दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवासमवेत समितीची साक्ष घेण्यात आली होती सदर साक्षीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्द्यानुसार ताडपत्री वाटपाबाबत नमुनादाखल काही लाभार्थ्यांची चौकशी केली असता त्यांना ताडपत्री प्राप्त झाल्याचा विस्तार अधिकारी (पंचायत) यांचा अहवाल प्राप्त आहे पंचायत समिती सभागृहाने सदर आर्थिक वर्षात राबवावयाच्या योजनांचा अंदाजपत्रकात समावेश करून अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानुसार **सदर योजनांची नियमानुसार सक्षम अधिकारी यांच्याकडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाला पुरवठा आदेश देऊन नियमानुसार खरेदी प्रक्रिया राबविली आहे त्यामुळे यामध्ये अनियमितता आढळून आलेली नाही असे सचिवांनी दिलेले उत्तर बरोबर आहे असे समितीने मत व्यक्त केल्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

### विहिरीबाबत प्राथम्यक्रम ठरवितांना ईश्वर चिठ्ठी काढणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान मानोरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडून पंचायत समिती, मानोरा या ठिकाणी विहिरीबाबत प्राधान्यक्रम ठरविताना ईश्वर चिठ्ठी काढण्यात आल्यामुळे गरीब लोकांना लाभापासून वंचित ठेवण्यात येत असल्याप्रकरणी असा खुलासा करण्यात आला की, ही योजना महात्मा गांधी रोजगार हमी योजना मध्ये आहे. यामध्ये विहिरींची कामे चालू आहेत. एकूण १३०१ विहिरी पूर्ण झाल्या आहेत. मागील वर्षी ६७६ चे लक्ष्य होते त्यापैकी ३१२ विहिरी पूर्ण झाल्या आहेत. काही लोकांच्या विहिरी पूर्ण झाल्या आहेत परंतु पंचायत समितीकडे कुशल देयकाकरिता पैसे नसल्यामुळे दुय्यम प्रत समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे पूर्णत्वाचा दाखला दिलेला नाही. पंचायत समितीने सार्वजनिक कामांना प्राधान्य दिलेले आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये विहिरीकरिता ३ लाख रुपये दिले जातात. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, मागील वर्षी नागपूर येथील अधिवेशन काळात मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक झाली होती. त्यावेळी प्रत्येक तालुक्यास आमदारांच्या मागणीप्रमाणे १००० विहिरींचे लक्ष्य दिले होते. यामध्ये खूप तक्रारी आलेल्या असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी परिपत्रक काढून पंचायत समितीला सूचना दिलेल्या आहेत, त्याप्रमाणे पंचायत समितीने कार्यवाही केली आहे. लक्ष्य आहे त्या पेक्षा जास्त अर्ज असतील तर ईश्वर चिठ्ठीद्वारे लाभार्थी निवडावेत असा या परिपत्रकात उल्लेख आहे. मागणी जास्त असल्याने अशी चिठ्ठी काढण्याची बाब मा. न्यायालयाने देखील मान्य केलेली आहे. कारण विहिरींची मागणी फार मोठ्या प्रमाणावर आहे, तसेच सातत्याने मागणी वाढत आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक हिताची किंवा रस्त्यांची कामे सुरु केल्यानंतर मजूरांची उपलब्धता होत नाही, ही देखील अडचणीची बाब आहे. मजूर उपलब्ध होत नसल्याने खूप तक्रारी होतात. विहीरीचे काम असे आहे की, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ सुद्धा मिळतो व मजुरांसाठी कामसुद्धा उपलब्ध होते. [ या योजनेकरिता निधी मिळतो ] पूर्वी एका तालुक्याचे २७५ विहिरींचे लक्ष्य होते, ते आता १००० विहिरी असे केले आहे, यावर समितीने अशी विचारणा केली की, तालुक्यामध्ये पंचायत समितीनिहाय १००० विहीरी करावयाच्या असल्याने ग्रामसभेची मंजूरी घेऊन पाठविण्याबाबत का सांगितले नाही. ईश्वर चिठ्ठी काढली जाते, परंतु जो अत्यंत गरजू आहे, ज्याला विहिरीची अत्यंत गरज आहे, त्यांची चिठ्ठी निघाली नाही तर त्याच्यावर मोठा अन्याय होतो, खरा लाभार्थी वंचित राहतो. त्यामुळे प्राथम्यक्रमाची यादी अगोदर का तयार केली जात नाही. गावामध्ये ५० विहीरी द्यावयाच्या असतील, ग्रामसभेकडे १०० नावे आली असल्यास, ग्रामसेवकानी तपासून आवश्यकता पाहून प्राथम्यक्रम यादी का तयार केली नाही. आपण घरकुलाचे वाटप करताना प्राथम्यक्रम ठरवितो, त्याप्रमाणे विहीरींचे वाटपात प्राथम्यक्रम का ठरविले जात नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, प्राथम्यक्रम काढल्यानंतर ज्या विहिरी शिल्लक राहिल्या आहेत, त्यामध्ये चिठ्ठया टाकल्या आहेत. गावनिहाय लक्ष्य ठरविले होते. ज्या गावामध्ये लक्ष्यापेक्षा मागणी संख्या जास्त आहे, तेथे चिठ्ठया टाकाव्या लागल्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, परंतु तरीही चिठ्ठया टाकण्याची पद्धती अजिबात योग्य नाही. केवळ वाशिम जिल्ह्यामध्ये ही चिठ्ठया टाकण्याची पद्धत समितीला पहावयास मिळाली आहे. गटविकास अधिकारी हे प्रशासकीय अधिकारी तेथे असल्याने त्यांनी या प्रकरणी अभिप्राय द्यावयाचा असतो. शासनामध्ये काम करीत असताना काही कार्यपद्धती निश्चित केलेल्या आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कक्षेबाहेरचे काम असल्यास शासनाचे मार्गदर्शन व अभिप्राय घेतले पाहिजे होते, असे का केले नाही. आरोग्य, शिक्षण, अपंग कल्याण, जलसंपदा, लघुसिंचन यावर तरतूद न करता केवळ विहिरींबाबत बोलत आहात. सरपंचांचे संमेलन आयोजित करणेकरिता १० हजार रुपये तरतूद केली, परंतु हे १० हजार रुपये आपण खर्च करु शकला नाही, सरपंचांना प्रशिक्षण का दिले नाही ? तसेच समाजकल्याण विभागास समितीला नोंदवही दाखविण्याबाबत सांगितले होते, नोंदवही बैठकीच्या दालनात आणली असल्यास समितीच्या अवलोकनार्थ सादर करावी. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, होय, सदरहू नोंदवही आता आणलेली असून ते समितीसमोर सादर करतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अंदाजपत्रकाबाबत अधिकारी व्यवस्थित उत्तर देताना दिसत नाही. त्यामुळे समितीचे समाधान होत नाही, यामुळे समितीचा वेळ निष्कारण वाया जात आहे. या प्रकरणामध्ये ईश्वर चिठ्ठी काढण्याचा प्रश्नच नव्हता, एकाच संवर्गात जास्त लोकांचे अर्ज विहिरीकरिता आल्यास त्यांचे निकषाप्रमाणे वर्गीकरण करणे गरजेचे होते. त्यानुसार प्राधान्यक्रम निश्चित केला पाहिजे होता. याबाबत शासनाशी काही पत्रव्यवहार केला असल्यास तो समितीला दाखविण्यात यावा. जास्त मागणी आल्यास पुढील वर्षी त्यांचा विचार करावयास पाहिजे होता. तद्नंतर याप्रकरणी समितीने असे निदेश दिले की, विहीरीबाबत ईश्वर चिठ्ठी काढणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्राधान्यक्रम ठरविताना गरीब लोकांना वंचित ठेवण्याचे काम ईश्वर चिठ्ठीद्वारे होत आहे. यामुळे गरजूला विहीर मिळाली नाही. याबाबत झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला कळविण्यात यावा. या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी. **उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, मानोरा या ठिकाणी विहिरीबाबत प्राधान्यक्रम ठरवितांना ईश्वर चिठ्ठी काढण्यात आल्यामुळे गरीब लोकांना लाभापासून वंचित ठेवण्यात येत असल्याप्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे ? पंचायत समिती, मानोरा या ठिकाणी विहिरीबाबत प्राधाम्यक्रम ठरवितांना ईश्वर चिठ्ठी काढण्यात आल्यामुळे गरीब लोकांना लाभापासून वंचित ठेवण्यात येत असल्याप्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सदरहू मुद्याच्या अनुषंगाने विहिरीबाबत ईश्वर चिठ्ठीचे परिपत्रक मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी काढल्यामुळे सदरचे अनुपालन उप जिल्हाधिकारी (रोहयो) वाशिम यांचे कार्यालयाचे पक्र. कक्ष-९/रोहयो/सकाअ/कावि/७३१/२०१८, दिनांक ६/११/२०१८ चे पत्रानुसार प्राप्त अनुपालन अहवाल खालीलप्रमाणे :—

वाशिम जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत पालकमंत्री सहस्त्र सिंचन विहिर योजना राबविण्याबाबत मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचे कार्यालयाचे परिपत्रक क्र.३०७/नरेगा-२०१६ दि. १३.१२.२०१६ नुसार तालुक्यातील एकूण पात्र लाभार्थ्याची संख्या उद्दिष्टापेक्षा कमी असल्यास सर्व लाभार्थ्यांना विहिर मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे व कार्यारंभ आदेश, लेआउट देणे, हजेरीपट काढणे व प्रत्यक्ष विहीरीच्या कामाला गट विकास अधिकारी यांनी सुरुवात करावी. असे सदर परिपत्रकानुसार मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी निर्देश दिले. तसेच पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम झाल्यानंतर जर एकूण पात्र अर्जाची संख्या उद्दिष्टापेक्षा जास्त असल्यास त्या तालुक्यास दिलेले नवीन उद्दिष्ट, अर्जाची संख्या, ग्रामपंचायतीची संख्या आणि संबंधित ग्रामपंचायतीमधील समाविष्ट सर्व गावांची मिळून लोकसंख्या विचारात घेऊन, विहीरीचे वाटप करावे. प्रत्येक ग्रामपंचायतीमधील समाविष्ट सर्व गावांची मिळून लोकसंख्या विचारात घेऊन विहीरीचे वाटप करावे. प्रत्येक ग्रामपंचायतीने आलेल्या उद्दिष्टा एवढे लाभार्थ्यांची निवड ही एकूण पात्र लाभार्थ्यांच्या नावाच्या ईश्वर चिठ्ठी काढून त्यातून करण्यात यावी. यासाठी तहसीलदार व गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीमध्ये ईश्वर चिठ्ठी काढण्याबाबतची दिनांक व वेळ निश्चित करावी तत्पुर्वी सर्व लाभार्थ्यांना तसेच लोकप्रतिनिधी यांना ईश्वर चिठ्ठीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळवावे. व त्यांच्या उपस्थितीत ईश्वर चिठ्ठीद्वारे उद्दिष्टाएवढे लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. सदर लाभार्थी निवडीचे अधिकार तहसिलदार यांना देण्यांत येत आहेत. तसेच उर्वरित लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. सदरची प्रतिक्षा यादी ही देखील ईश्वर चिठ्ठी द्वारेच प्राधान्यक्रम देऊन तयार करावी. असे निर्देश सदर परिपत्रकान्वये जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी यांना दिलेले आहेत. सदर परिपत्रकाप्रमाणे लाभार्थ्यांची संख्या उद्दिष्टापेक्षा कमी असल्यास सर्व लाभार्थ्यांना विहिर मंजूर करण्याची कार्यवाही करावी व अर्जाची संख्या उद्दिष्टापेक्षा जास्त असल्यास ईश्वर चिठ्ठी काढून त्यातून निवड करण्यात यावी. असे निर्देश जिल्ह्यातील गट विकास अधिकारी तसेच तहसीलदार यांना सदर परिपत्राकान्वये देण्यात आले आहे. मा.जिल्हाधिकारी वाशिम यांचे परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यांत आली आहे. परिपत्रकाबाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन होण्याची आवश्यकता आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती कार्यालयाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मानोरा तालुक्यातील सिंचन विहिरीबाबत सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात साक्षीसाठी विधानमंडळाकडून प्रश्नावलीमधील अनु.क्र.८ ही बाब रोजगार हमी योजनेशी संबंधित असून सदर योजनेतील विहिरीच्या लाभार्थी निवडीबाबत आहे. सदर विषयी जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या दिनांक २९/१२/२०१८ च्या अहवालाचे अवलोकन केले असता, सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी दोषी व्यक्तींवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या दिनांक ३१/१२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :** विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी अनुक्रमे दिनांक २ व २२ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान पंचायत समिती, मानोरा येथील विहिरीबाबत प्राधान्यक्रम ठरवितांना ईश्वर चिठ्ठी काढण्याबाबत सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती मानोरा अंतर्गत विहिरींबाबत प्राधान्यक्रम ठरविताना ईश्वर चिठ्ठी काढून विहिरींचे वाटप केले होते असा आक्षेप होता. याबाबतची पार्श्वभूमी अशी आहे की, मध्यंतरीच्या काळात जिल्हा परिषदेला ६००० विहिरींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी योजना तपशीलवार तयार

केली होती. यावर समितीने विचारणा केली की, शासन निर्णयामध्ये एससी, एसटी, ओबीसी, परित्यक्त्या इत्यादी क्रमवारी ठरवून दिली आहे काय यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीने विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा केली की, साधारणपणे जे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी २५०० अर्ज पात्र ठरले होते. त्यात अनुसूचित जातीचे ४८, अनुसूचित जमातीचे ५४ लाभार्थी होते. विभागीय आयुक्तांनी या प्रकरणाचा अभिप्रायासह चौकशी अहवाल सादर केला आहे, या विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली होती. ती जनहित याचिका मा.उच्च न्यायालयाने निकाली काढली. जिल्हाधिका-यांची कार्यवाही योग्य ठरविली आहे. जे लोक मा.न्यायालयात गेले होते त्यांना मा.उच्च न्यायालयाने सांगितले की, तुम्ही तुमचे गा-हाणे जिल्हाधिका-यांसमोर मांडा. यामध्ये एससी, एसटीचे लाभार्थी निवडले होते. यामध्ये असे म्हटले आहे की, “It is brought to our notice that a call came to .. those 222 beneficiaries by the Executive Zillha Parishad and the concerned Collector the document of 135 were satisfactory and they were included amongst the beneficiaries entitled to get the benefit of Wells, and it seems that rest of them though represented they were not qualified and other did not represent.” यावर समितीने विचारणा केली की, मा.उच्च न्यायालयात वंचित लाभार्थी गेले होते का? यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी खुलासा केला की, वंचित लाभार्थी मा.उच्च न्यायालयात गेले होते. दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजीचे हे आदेश आहेत.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, विभागाच्या अधिका-यांनी मा.उच्च न्यायालयापुढे ईश्वर चिठ्ठीचे समर्थन केले होते का, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी खुलासा केला की, जनहित याचिका त्या मुद्यावर दाखल झाली होती. परिपत्रक जिल्हाधिका-यांनी काढले होते. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, लाभार्थ्यांची निवड कशी करायची याचे निकष ठरलेले आहेत. त्या आधारे लाभ दिला गेला पाहिजे. ईश्वर चिठ्ठीचा प्रश्न उद्‌भवत नाही हा विषय गंभीर आहे हा विषय प्रलंबित ठेवण्यात यावा. यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी खुलासा केला की, मा.उच्च न्यायालयाकडून निर्णय आलेला आहे आणि विभागीय आयुक्तांनी जे अभिप्राय दिले आहेत ते समितीला सादर करतो.

दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी आयोजित केलेल्या साक्षीदरम्यान ईश्वर चिठ्ठी संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये नियम ठरवून देण्यात आले आहेत. परंतु लक्ष्यापेक्षा जास्त लाभार्थी आल्यामुळे त्यांनी ईश्वर चिठ्ठी काढून लाभार्थी निश्चित केले. यामध्ये चौकशी केली असता काहीही चुकीचे करण्यात आले नाही. विभागाला अशी विनंती केली की, ईश्वर चिठ्ठी काढताना लक्ष्य निश्चिती पेक्षा जास्त लोक आले तर तुमच्याकडे संगणक असतात. प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णयाचा योग्य अर्थ लावून कार्यवाही करावी. यामध्ये जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णयाचा अर्थ लावलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, विहीर मंजूर करण्याची नस्ती जिल्हाधिकारी यांच्यापर्यंत जात नाही. यामध्ये जिल्हाधिकारी यांनी हस्तक्षेप कसा काय केला. असे असेल तर जिल्हाधिकारी यांना साक्षीला बोलविण्यात यावे. जास्त लाभार्थी आले असे सचिवांनी सांगितले आहे. ज्यांना विहिरीची आवश्यकता आहे म्हणून त्या लाभार्थ्यांनी अर्ज केलेला आहे. जिल्हाधिकारी यांनी हस्तक्षेप करून ईश्वर चिठ्ठी काढली. त्यातून काही लाभार्थ्यांना फायदा मिळाला परंतु इतर लाभार्थ्यांचे काय त्यांची यादी तयार करण्यात आली आहे काय, ५ लाभार्थ्यांना लाभ द्यायचा असेल व लाभार्थ्यांची संख्या २५ असेल, जे उर्वरित २० लोक आहेत त्यांचा क्रमाक्रमाने नंबर लागला पाहिजे. ईश्वर चिठ्ठी काढल्यानंतर इतर लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याचा विचार केला पाहिजे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, खुल्या पद्धतीने किंवा क्रमवारीने असा कोणताही नियम लावला तरी सर्वच लाभार्थ्यांना लाभ मिळाला पाहिजे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हाधिकारी यांनी कोणत्या आधारावर ईश्वर चिठ्ठी काढली. जिल्हाधिकारी यांना अधिकार कोणी दिला. यावर उप सचिव, रोजगार हमी योजना, विभाग यांनी समितीला विदित केले की, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये त्या वेळी धडक विहिरींची योजना सुरु होती. त्याचप्रमाणे नरेगा ही योजना सुरु होती. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री महोदयांनी असा निर्णय घेतला की, पालकमंत्री सहस्त्रसिंचन विहीर योजना ही जिल्ह्याकरिता तयार केली होती. प्रत्येक तालुक्यात एक हजार विहीरी द्याव्यात अशी योजना तयार करण्यात आली. प्रत्येक तालुक्यात विहिरी दिल्या त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी समन्वयाची भूमिका बजावली आहे. पालकमंत्री महोदयांच्या नावाने वेगवेगळ्या योजना सुरु केल्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पालकमंत्री महोदयांनी बैठक घेतली तेव्हा पालकमंत्री सिंचन विहीर योजना शासनाने मंजूर केली होती काय, लक्ष्य पूर्ण करायचे होते तर ग्रामसभेने ठराव घ्यायला पाहिजे होता. ग्रामसभेने व आमसभेने ती नावे पंचायत समितीकडे पाठवायला पाहिजे होती. पंचायत समितीने छाननी करून ती नावे जिल्हा परिषदेकडे पाठवायला पाहिजे होती. २०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता देणे अपेक्षित आहे. या योजनेमध्ये पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांचा काहीही संबंध येत नाही. ईश्वर चिठ्ठीच्या विषयासंदर्भात आपण खुलासा सादर करावा. जिल्हाधिकारी यांचा काहीही संबंध येत नाही. या समितीचे अध्यक्ष व सदस्यांमध्ये पालकमंत्री व जिल्हाधिकारी आहेत असे तरी समितीला दाखवावे. यावर उप सचिव, रोजगार हमी योजना, विभाग यांनी समितीला विदित केले की, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांमध्ये धडक सिंचन विहिरींचा कार्यक्रम सुरू होता. धडक सिंचन योजनेच्या काही विहीरी नरेगामध्ये वर्ग कराव्यात अशी

मागणी काही लाभार्थ्यांची होती. नरेगाचा नवीन कार्यक्रम सुरु होता. तसेच नवीन नरेगाचा कार्यक्रम सुरु होता. त्यामुळे सर्व विहिरी लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने रोजगार हमी योजनेसाठी जिल्हाधिकारी हे जिल्हा नियोजन समितीचे सचिव म्हणून काम करीत असतात. त्यामुळे अधिकाराच्या दृष्टीने जिल्हा नियोजन समिती म्हणून महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये त्यांचा अधिकार असतो. त्यामुळे जिल्हाधिका-यांचा यामध्ये संबंध येत नाही, असे म्हणू शकत नाहीत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हाधिका-यांचा निवडप्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध येत नाही. यामध्ये लाभार्थी हा दीड एकरपेक्षा अधिक जमीन नसणारा असावा, पाच किंवा सात विहिरी द्यावयाच्या असतील तर तो लाभार्थी हा मागासवर्गीय किंवा आदिवासी असला पाहिजे. त्याचप्रमाणे पाचव्या क्रमांकावर इतर मागासवर्गीय लाभार्थ्यांचा समावेश आहे. अशा प्रकारे नियम ठरवून दिलेले आहेत. यावर उप सचिव, रोजगार हमी योजना, विभाग यांनी समितीला विदित केले की, लाभार्थी निवडीमध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप केलेला नाही. यामधील कार्यपद्धती पारदर्शक पद्धतीने व्हावी, असा त्यांचा हेतू होता. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांचे अधिकार वापरावे, असे सांगितलेले आहे. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मंजुरीमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप केलेला नाही. त्यांनी केवळ कार्यपद्धती ठरवून दिलेली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामुळेच गटविकास अधिकारी यांचेकडे असलेले हे अधिकार शासनाने मुख्य कार्यकारी अधिका-यांना दिलेले आहेत. याबाबत जलसंधारण विभागाच्या सचिवांकडे माहिती घेतली होती. पंचायत समितीचे सन २०१६-१७ चांदूर गावाचे २६२ एवढे उद्दिष्ट होते. तहसिलदारांना दिलेले उद्दिष्ट हे देखील २६२ होते. पंचायत समितीने २०० विहिरी अथक प्रयत्न करून मंजूर केल्या होत्या. परंतु तहसिलदारांकडून २५ विहिरीदेखील मंजूर झालेल्या नाहीत. राज्य सरकारने ५४० विहिरींचे उद्दिष्ट दिले होते विहिरी मंजूर करण्याची प्रक्रिया वेगवान झाली काय, ही प्रक्रिया वेगवान झालेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित ठेवण्याचे काम आपण करीत आहोत, असे म्हणावे लागेल. यावर उप सचिव, रोजगार हमी योजना, विभाग यांनी समितीला विदित केले की, बुलडाणा शहरामध्ये बी अँड सी ला देखील विहिरी करण्याचे काम दिले होते. त्याचप्रमाणे राज्य सरकारच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देखील अशा प्रकारचे काम देण्यात आले होते. या विषयामध्ये आता जिल्हाधिकारी आणि तहसिलदार कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करीत नाहीत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, तेराव्या वित्त आयोग निधीतून केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (पंचायत समिती, कारंजा) या मुद्याबाबत माहिती देण्यात यावी. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणामध्ये जी अधिकची रक्कम देण्यात आली होती ती वसूल करण्यात आलेली आहे. खाजगी विहीर बोर अधिग्रहण मोबदला रक्कमेचे जादा प्रदानाबाबत (पंचायत समिती मंगरुळपीर) या विषयी समितीला माहिती देण्यात यावी. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या विषयाबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

मानोरा पंचायत समिती अंतर्गत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये विहिरींची कामे चालू आहेत गटविकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार एकूण १३०१ विहीरी झाल्या आहेत. मागील वर्षी ६७६ विहीरीचे लक्ष्य होते त्यापैकी ३१२ विहीरी पूर्ण झाल्या आहेत. विहीरीकरीता ३ लाख रुपये दिले जातात पूर्वी एका तालुक्यासाठी २७५ विहीरीचे उद्दीष्ट होते आता प्रत्येक तालुक्यास आमदारांच्या मागणी प्रमाणे १००० विहिरींचे उद्दिष्ट दिले आहे. यामध्ये खूप तक्रारी आलेल्या असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी परिपत्रक काढून पंचायत समितीला सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार उद्दिष्टापेक्षा जास्त अर्ज आले असतील तर ईश्वर चिठ्ठीद्वारे लाभार्थी निवडावेत असा त्या परिपत्रकात उल्लेख आहे. मागणी जास्त असल्याने अशी चिठ्ठी काढण्याची बाब मा.न्यायालयाने देखील मान्य केलेली आहे. कारण विहीरींची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे तसेच सातत्याने मागणी वाढत आहे, मजूर उपलब्ध होत नसल्याने खूप तक्रारी होतात. विहीरीचे काम असे आहे की, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळतो मजुरांसाठी काम सुद्धा उपलब्ध होते व योजनेकरिता निधी मिळतो.

तथापि समितीच्या मते जो अत्यंत गरजू आहे. ज्याला विहिरीची अत्यंत गरज आहे त्या गरजू व्यक्तीची चिठ्ठी निघाली नाही तर त्याच्यावर मोठा अन्याय होतो व खरा गरजू वंचित राहतो. त्यामुळे प्राथम्यक्रमाची यादी अगोदर तयार करणे आवश्यक होते, ज्याप्रमाणे घरकुलाचे वाटप करताना प्राथम्यक्रम ठरविला जातो त्याप्रमाणे विहिरीच्या वाटपात देखील प्राथम्यक्रम ठरविण्याची आवश्यकता आहे. प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समितीने साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, प्राथम्यक्रम काढल्यानंतर ज्या विहिरी शिल्लक राहिल्या आहेत त्यामध्ये चिठ्ठ्या टाकल्या आहेत. गावनिहाय विहीरीचे लक्ष्य ठरविण्यात आले होते. ज्या गावामध्ये लक्ष्यापेक्षा मागणी संख्या जास्त आहे तेथे चिठ्ठ्या टाकाव्या लागल्या. पंचायत समिती मानोरा येथील विहिरीबाबत वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी अनुक्रमे दिनांक २ व २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सदर योजनेंतर्गत साधारणपणे जे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी २५०० अर्ज पात्र ठरले होते त्यामध्ये

अनुसूचित जातीचे ४८, अनुसूचित जमातीचे ५४ लाभार्थी होते विभागीय आयुक्तांनी या प्रकरणाचा अभिप्रायासह चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाने ती जनहित याचिका निकाली काढलेली असून जिल्हाधिका-यांची कार्यवाही योग्य ठरविली आहे. जे लोक मा.न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले होते त्यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशानुसार मा. उच्च न्यायालयाने त्यांचे गा-हाणे त्यांनी जिल्हाधिका-यांसमोर मांडावे असा निकाल दिलेला आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीमध्ये संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री अध्यक्ष असतात, पालक मंत्री सहस्त्र विहीर योजना ही जिल्ह्याकरिता तयार करण्यात आली होती त्यावेळी जिल्हाधिका-यांनी समन्वयाची भूमिका बजावली आहे जिल्हाधिका-यांनी केवळ कार्यपद्धती ठरवून दिलेली आहे.

**ग्रामीण भागातील व विशेषतः विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाद्वारे सुरू करण्यात आलेल्या धडक मोहिमेची १००% फलश्रूती झालेली असल्याचे समितीस वाशिम जिल्ह्यात आढळून आले नाही. विहिरींसाठी ठरविण्यात आलेल्या लक्ष्याच्या संख्येपेक्षा जास्त लाभार्थी असल्यामुळे ईश्वर चिठ्ठी काढून लाभार्थी निश्चित केले आहेत. ईश्वर चिठ्ठी काढल्यानंतर इतर लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने शासन निर्णयाद्वारे जी पद्धत विशद केली आहे त्या पद्धतीद्वारेच लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने लाभार्थ्यांना जिल्हाधिकारी यांचेकडे दाद मागण्यास सांगितल्यानुसार लाभार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेवून लाभार्थ्यांना विहिरीचा लाभ तातडीने कसा मिळेल याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी व यादृष्टीने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

### जिल्ह्यातील कुपोषित बालकांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, स्तनदा माता, गरोदर माता व शून्य ते सहा वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येतो, त्यांची संख्या किती आहे. यावर प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१४-१५ मध्ये स्तनदा माता १४६० होत्या, गरोदर माता १२६२ होत्या. ३ ते ६ वयोगटातील मुलांची संख्या ८५५७ होती. सॅममध्ये २२ मुले व मॅममध्ये १५१ बालके अशी एकूण १७३ कुपोषित बालके आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण स्तनदा व गरोदर माता आणि बालकांना पूरक पोषण आहार देतो तरी देखील कुपोषित बालकांचे प्रमाण कमी का होत नाही. यावर प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा केला की, पूरक पोषण आहार हा पौष्टीक आहार आहे, तो वाटप केल्यानंतर कसा घ्यावा हे भेटीच्या वेळी समजावून सांगण्यात येते. हा आहार लोहयुक्त असतो, महिला बाळंत झाल्यानंतर बाळाला आईचे दूध द्यावे असे समजावून सांगण्यात येते. बाळाचा जन्म झाल्यानंतर मातेचे दूध बाळाला दिले तर बाळाची प्रकृती चांगली होते. अशा सर्व बाबी समजावून सांगण्यात येतात. यावर समितीने विचारणा केली की, आपण जे मार्गदर्शन करता ते बरोबर आहे, इतक्या मोठ्या प्रमाणात पूरक पोषण आहाराचे वाटप गरोदर माता, स्तनदा माता व बालकांना होत असताना कुपोषणाचे प्रमाण कमी का होत नाही.

यावर प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा केला की, जन्म देणारी माता असेल तर चांगले मुल जन्माला येईल त्यासाठी तीन महिन्यांपासून पूरक पोषण आहार देण्यात येतो. यावर समितीने विचारणा केली की, माहितीप्रमाणे गरोदर माता, स्तनदा माता व बालके पूरक पोषण आहार खात नाहीत, ही सर्व आकडेवारी बोगस दाखविण्यात येत आहे. अनसिंग येथे अंगणवाडीमध्ये किती मुले आहेत. वाशिम तालुक्याचे एका महिन्याचे पूरक पोषण आहाराचे देयक किती रुपयांचे आहे.

यावर प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा केला की, वाशिम तालुक्यातील एका महिन्याचे पूरक पोषण आहाराचे देयक १४ लाख रुपयांचे आहे. पूरक पोषण आहाराचा करारनामा करण्यात आलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, पूरक पोषण आहाराचे गोदाम कोठे आहे, एकात्मिक बाल विकास अधिकारी यांनी सदर गोदामाला भेट दिली आहे काय, यावर प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खुलासा केला की, वाशिम जिल्ह्यासाठी पूरक पोषण आहाराचे दोन केंद्र आहेत, एक हिंगोली येथे आहे व दुसरे वाशिम येथे आहे. वाशिम पंचायत समितीला वाशिम येथील केंद्रातून पूरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येते. वाशिम तालुक्यात कळंबा महाली येथे पूरक पोषण आहार केंद्र आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत मराठीमध्ये आहे तर पूरक पोषण आहाराचा पुरवठा करारनाम्याची प्रत इंग्रजीमध्ये आहे. याबाबत साक्षीच्या वेळी सचिवांना विचारणा करण्यात येईल. तसेच वाशिम जिल्ह्यात एका ग्रामपंचायतीचे पूरक पोषण आहाराचे देयक १५-१६ लाख रुपये येत आहे. मग कुपोषित बालकांची संख्या कशी वाढली, गरोदर व स्तनदा मातांनाही पूरक पोषण आहार देतो, तरी बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण का थांबले नाही, एका तालुक्यात १२० ते १३० कुपोषित बालके आहेत, म्हणजे तुमचा पूरक पोषण आहार बोगस आहे किंवा पूरक पोषण आहार लाभार्थी खात नाहीत किंवा त्याचे वाटपच होत नाही, हा गंभीर विषय आहे. पूरक पोषण आहाराचे एवढ्या रकमेचे देयक असून देखील कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात येत नसेल तर काहीही उपयोग होणार नाही. समिती शासनाला पूरक पोषण आहाराबाबत धोरण ठरवून देईल. पूरक पोषण आहाराचे धोरण शासनाच्या वरिष्ठ स्तरावर ठरविलेले असून कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी त्याची अंमलबजावणी करीत आहेत. पूरक पोषण आहाराचा करारनामासुद्धा एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नाही. त्यामुळे पंचायत समितीला कोणते साहित्य येणार आहे किंवा दिले जाणार आहे हे माहिती नाही. शालेय पोषण आहाराचा करारानामा मराठी भाषेत आहे व ज्यांना इंग्रजी येत नाही अशा अंगणवाडी सेविकांकरिता करारनामा लॅटीन इंग्रजीमध्ये केलेले आहे. त्या इंग्रजीचा अर्थ शिकलेल्या व्यक्तीलाही लवकर समजत नाही. पूरक पोषण आहाराचे वाटप तालुका स्तरावरून केले पाहिजे, परंतु हिंगोलीच्या एजन्सीला निविदा दिली आहे. त्यांनी वाशिम येथे केंद्र चालू केले आहे असे आपले म्हणणे आहे. समितीने गोदाम पाहिले असता सदर व्यक्ती अकोल्याची आहे असे निदर्शनास आले. १६ लाख रुपयांचा पूरक पोषण आहार एका तालुक्यात वाटप केला जातो, तेथे जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीचा एक चपराशीसुद्धा नसतो ही बाब योग्य नाही. तालुक्याच्या ठिकाणी पूरक पोषण आहार केंद्र देण्याचे धोरण चुकीचे आहे. एका जिल्ह्याचा ठेका एका व्यक्तीला मिळाला तर तो संपूर्ण व्यवस्था करू शकतो. समितीची या विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या समवेत चर्चा आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वाशिम जिल्ह्यात एका तालुक्यात कुपोषित बालकांची संख्या १२० ते १३० आहे, त्याअर्थी या ठिकाणी मिळणारा पूरक पोषण आहार खराब आहे किंवा पूरक पोषण आहार लाभार्थी खात नाहीत किंवा पूरक पोषण आहाराचे वाटप होत नाही, एका ग्रामपंचायतीचे पूरक पोषण आहाराचे देयक रुपये १५ ते १६ लाख आहे, याप्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील सहा ग्रामीण प्रकल्पामध्ये माहे ऑक्टोबर, २०१८ अखेर एकूण १०६१ अतितीव्र कुपोषीत (SUW) बालकांची संख्या असून प्रकल्पनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.—

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | अतितीव्र कुपोषित बालकांची संख्या |
|---|---|---|
| १ | वाशिम ग्रा. | २२७ |
| २ | रिसोड | १७१ |
| ३ | मालेगाव | १३९ |
| ४ | मंगरुळपीर | १८८ |
| ५ | कारंजा | १११ |
| ६ | मानोरा | २२५ |
| | **एकूण** | **१०६१** |

वाशिम जिल्ह्यातील अतितीव्र कुपोषीत बालकांची टक्केवारी ही ० ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांच्या तुलनेमध्ये १.२८ टक्के एवढी आहे. बालकांमधील कुपोषणाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. आहार व पोषणाविषयी गैरसमजुती.

२. बालकांमधील किरकोळ आजार.

३. संसर्गजन्य आजार.

४. जन्मतःच असलेले आजार.

५. घरी अपुरा व कमी प्रतीचा आहार देणे

६. पूरक आहार उशीरा सुरू करणे.

७. स्तनपान कमी करणे अथवा न करणे.

८. अंधश्रद्धा व अपुरी माहिती.

९. मुला मुलींमधील भेदभाव.

१०. जन्मतः कमी वजनाची बालके.

११. कुटूंबातील व्यक्ती व्यसनाधीन असल्यास बालकांच्या पोषणाकडे दुर्लक्ष.

१२. जंकफुड खाण्याचे जास्त प्रमाण.

१३. कुटूंबातील व्यक्ती बाहेर कामाला जात असल्याने बालकांच्या पोषणाकडे दुर्लक्ष.

उपरोक्त कारणांमुळे बालकांमध्ये कुपोषण आढळुन येत असून यावर उपाय योजना करण्यात येत आहेत.

वाशिम जिल्ह्यातील एकूण सहा ग्रामीण प्रकल्पापैकी वाशीम ग्रामीण प्रकल्पाकरिता स्थानिक स्तरावर सुजाता स्वयं सहा. महिला बचत गट, वाशीम यांचेव्दारे अंगणवाडीस्तरावर घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येतो तसेच भक्ती महिला बचत गट, लिंगाला, हिंगोली यांचेद्वारे उर्वरीत पाच प्रकल्पातील अंगणवाडीस्तरावर घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येतो.

अंगणवाडी केंद्रावर प्राप्त होणारा घरपोच आहार पुरवठा करण्यापूर्वी संबंधित पुरवठेदार बचत गट हे त्या आहाराचे प्रयोगशाळा परिक्षण करून त्याबाबत अहवाल सादर करतात. तसेच या कार्यालयाकडूनही अंगणवाडी केंद्रांना भेटी देण्यात येतात व आहाराची अचानक तपासणी करण्यात येऊन वेळोवेळी आहाराच्या पाककृती शासकीय/NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेला तपासणीकरिता सादर करण्यात येतात. या कार्यालयाद्वारे अशाप्रकारे प्रयोगशाळेला सादर करण्यात आलेल्या नमुना पाककृतीचे तपासणी अहवाल अनुकूल प्राप्त झालेले आहेत.

लाभार्थ्यांना दिला जाणारा घरपोच आहार उपयोगात आणणे, दररोज देण्यात येणारे प्रमाणे इ. बाबत अंगणवाडी स्तरावर लाभार्थी तथा लाभार्थ्यांचे पालक यांना माहिती देण्यात येते. तसेच सदरहू घरपोच आहारापासून विविध रुचकर पाककृती बनविण्यात येऊन त्यांचे अंगणवाडी स्तरावर, प्रकल्पस्तरावर व जिल्हास्तरावर प्रदर्शन भरविण्यात येते. या रुचकर पाककृतींबाबत लाभार्थी तसेच लाभार्थ्यांचे पालक यांना मार्गदर्शन व प्रात्यक्षिक देण्यात येतात. घरपोच आहारापासून विविध रुचकर पाककृती बनविणे त्याबाबत जनसामान्यांमध्ये माहिती देणे याकरिता वेळोवेळी विविध स्तरावर प्रदर्शने तथा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यासंबंधी या आर्थिक वर्षामध्ये गावस्तर, प्रकल्पस्तर व जिल्हास्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिकाचे वितरणही करण्यात आलेले आहे.

पुरवठेदार बचत गटाद्वारे अंगणवाडी केंद्रावर प्राप्त होणारा घरपोच आहार हा अंगणवाडी केंद्राचे साठा नोंदवहीमध्ये नोंदविण्यात येऊन त्यानुसार लाभार्थ्यांना वाटप केला जातो. तसेच त्या लाभार्थ्यांना घरपोच आहार वाटप केल्याबाबत त्यांची वाटप नोंदवहीवर स्वाक्षरी घेण्यात येते.

घरपोच आहार पुरवठा करणेबाबत संबंधित बचत गटांना अंगणवाडीनिहाय लाभार्थी संख्या कळविण्यात येऊन त्यानुसारच घरपोच आहाराची मागणी करण्यात येते. त्यामुळे अंगणवाडीतील लाभार्थीनुसार पुरवठा करण्यात येतो व देयक अदा केली जातात. त्यामुळे एका ग्राम पंचायतीमध्ये असणारी अंगणवाडी संख्या व त्यामधील लाभार्थी संख्येच्या प्रमाणातच देयक अदा केले जाते. त्यामुळे एका ग्रामपंचायतीचे घरपोच आहाराचे देयक हे रुपये १५ ते १६ लक्ष होत नाही. सरासरी एका प्रकल्पाचे रुपये १५ ते १६ लक्ष एवढे देयक अदा केले जाते.

कोणत्याही ग्रामपंचायतीचे देयक हे रुपये १५ ते १६ लक्ष एवढे अदा न केल्याने चौकशी अहवाल निरंक आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**महिला व बाल विकास विभागाचे अभिप्राय :–**प्रस्तुत परिच्छेदावरील वाशिम जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीस अंगणवाडीमध्ये देण्यात येणा-या आहारासंबंधात सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी खुलासा केला की, पूरक पोषण आहार (टीएचआर) आणि गरम अन्न (हॉट मील) असा दोन्ही प्रकारचा आहार दिला जातो. तरी देखील वाशिम जिल्ह्यामध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. माहे ऑक्टोंबर, २०१८ च्या विवरणानुसार वाशिम जिल्ह्यामध्ये सन २०१८ मध्ये १ हजार ६१ बालके कुपोषित होती. पूरक पोषण आहार आणि गरम अन्न हा आहार बालकांना दिला जात असतानाही वाशिम जिल्ह्यामधील कुपोषण का संपले नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यामध्ये मूळ उत्तर असे आहे की, अंगणवाडी स्तरावर टीएचआर आणि हॉट मील दिले जाते. आहाराचा दर्जा योग्य नसल्यामुळे कुपोषण आहे किंवा कसे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यासंदर्भात समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, अंगणवाडी स्तरावर दिले जाणारे जेवण किंवा आहार मुलांना एकूण आवश्यक असलेल्या आहारापैकी केवळ ४० टक्के दिला जातो व उर्वरित ६० टक्के गरज घरामध्ये मिळणा-या आहारातून पूर्ण होणे अपेक्षित आहे. अंगणवाडीतील एका मुलाला दिवसभरातून कमीतकमी ६ वेळेस जेवण दिले पाहिजे.

महिला व बाल विकास विभागाच्या सचिवांनी दिलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने समितीच्या निदर्शनास आले की, कुपोषणाचे प्रमाण कमी झाले नाही, अति कमी वजनाचे प्रमाण कमी झाले नाही, कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी झाले नाही, काही बालकांना पूरक पोषण आहार मिळत नाही, काही बालकांना पूरक पोषण आहार मिळत असला तरी तो निकृष्ट दर्जाचा असेल, काही महिलांना गरोदरावस्थेच्या कालावधीमध्ये पूरक पोषण आहार मिळत नसेल, समितीने काही प्राथमिक आरोग्य केंद्रांची तपासणी केली असता प्रसुती झालेल्या महिलांना गरोदर अवस्थेच्या कालावधीत पूरक पोषण आहाराचे सेवन केले का असे विचारले असता त्यांनी सांगितले की, त्यांना पूरक पोषण आहार काय आहे, हेच माहीत नाही. अशा प्रकारचे गंभीर विषय निदर्शनास आल्यामुळे समितीस अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु विभागाने तयार केलेले उत्तर संयुक्तिक नाही. पात्र लाभार्थ्यांपर्यंत पूरक पोषण आहार पोहोचतो का, ते पूरक पोषण आहार खातात काय, तसेच पूरक पोषण आहाराचा चाचणी अहवाल वापर झाल्यानंतर मिळतो. देयकाच्या वेळी चाचणी अहवाल जोडला जातो. जोपर्यंत चाचणी अहवाल प्राप्त होत नाही, तोपर्यंत पूरक पोषण आहाराचा वापर करू शकत नाही, अशी करारनाम्यात अट आहे.

यावर सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी समितीस असे उत्तर दिले की, बॅच नंबरची चाचणी आणि स्वयं चाचणी अहवाल दिल्याशिवाय अंगणवाडीला पूरक पोषण आहाराचे वाटप केले जात नाही. तसेच अंगणवाडीमध्ये नमुने स्वीकारले जात नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, स्वयं चाचणी अहवाल हा पुरवठाधारकच घेत असतो. जोपर्यंत खुल्यारित्या चाचणी घेऊन चाचणी अहवाल प्राप्त करीत नाही, तोपर्यंत पूरक पोषण आहाराचा वापरच करता येत नाही. याचे कारण असे की, पुर्वीचा पुरवठा संपण्यापूर्वीच पुरवठा केला जातो. याचे कारण असे की, हा कालावधी चाचणी अहवाल घेण्यासाठी दिलेला असतो. १५ दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असेपर्यंत दुस-या महिन्याचा पुरवठा केला जातो. असे असतानाही कुपोषणाला थांबवू शकला नाहीत. याचा अर्थ असा आहे की, कमी वजन असलेले बालक आईच्या पोटात असताना संबंधित गर्भवती महिलेला पूरक पोषण आहार मिळाला नाही. परंतु तिच्या नावाच्या पूरक पोषण आहाराचे देयक घेण्यात आले व पैसे काढण्यात आले.

गर्भवती भगिनीला पूरक पोषण आहार मिळाला असता तर सुदृढ बालक जन्माला आले असते व कुपोषित बालकांची संख्या अत्यंत कमी झाली असती. अनेक अंगणवाडीमध्ये असे अभिलेखे अद्ययावत केलेले आहेत की, जी मुले अंगणवाडीमध्ये शिक्षण घेतच नाहीत. अभिलेख्यावर असलेले अनेक विद्यार्थी कॉन्व्हेंट शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. आपण याबाबत समाधानी आहात काय अशी समितीने सचिवांना विचारणा केली असता सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी विदित केले की, पूरक पोषण आहाराचे धोरण निश्चितपणे सुधारलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहे. गरोदर आणि स्तनपान करणा-या भगिनींनी त्याचा लाभ घेतलेला नाही. यासंदर्भात खुली चाचणी करून खात्री करण्यात येईल. जेवढे देयक निघते तेवढा पूरक पोषण आहाराचा पुरवठा होतो किंवा नाही, याबाबत खात्री करण्यात आलेली आहे. प्रथम बोली निघण्याचे प्रमाण अतिशय नगण्यवर आणलेले आहे. एका प्रकल्पाचे देयक १० ते १५ लाख रूपये आहे. तसेच सन २०१८ च्या विवरणानुसार वाशिम जिल्ह्यामध्ये सन २०१८ मध्ये १ हजार ६१ बालके कुपोषित आढळून आली होती. परंतु हा आकडा जेवण मिळाले नसल्यामुळे नाही. तर जी मुले अंगणवाडीमध्ये नियमित येतात, त्यांना पूरक पोषण आहार मिळतो.

यावर समितीने संबंधितांना पुढील प्रमाणे निदेश दिले की, पूरक पोषण आहार मिळत असला तरी ही बालके कुपोषित आढळून आलेली आहेत. तसेच त्यांचे वजन कमी आढळून आलेले आहे. त्यांचे वजन वाढावे आणि कुपोषणाचे प्रमाण थांबावे यासाठी आहार पुरविला जातो. या बालकांना घरी जो आहार मिळत नाही, त्यापेक्षा उच्च दर्जाचा आहार अंगणवाडीमध्ये दिला पाहिजे. ज्या गरोदर महिला भगिनी स्वतःच्या घरी हालाखीच्या परिस्थितीमुळे योग्य आहार घेऊ शकत नाही, त्यांना पूरक पोषण आहाराच्या माध्यमातून आहार पुरविला जातो. तरी देखील जन्माला येणा-या बालकाचे वजन अतिशय कमी असते. यामधून आपल्याला निष्कर्ष काढता येईल. आता गरोदर महिला भगिनीचे आरोग्य कार्ड बनलेले आहे. प्रत्येक महिन्याला तिचे वजन केले जाते व बाळाचे वजन किती वाढले आहे, हे पाहिले जाते. या प्रक्रियेवरून संबंधित भगिनी पूरक पोषण आहार खाते की, नाही हा निष्कर्ष काढला जातो. परंतु तसे मूल्यमापन केले जात नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-१४ या वर्षाच्या वाशिम जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, सन २०१४-१५ मध्ये स्तनदा माता १४६० होत्या गरोदर माता १२६२ होत्या, ३ ते ६ वयोगटातील मुलांची कुपोषित संख्या ८५५७ होती, २२ मुले अति कुपोषित बालके (सॅम) (severe Acute Malnutrition) आणि १५१ बालके कुपोषित (मॅम) (Moderate Acute Malnutrition ) मध्ये होती. पूरक पोषण आहार हा पौष्टिक आहार असून तो वाटप केल्यानंतर कसा घ्यावा हे आहार वाटपाच्या भेटीच्यावेळी समजावून सांगण्यात येते. हा आहार लोहयुक्त असतो व महिला बाळंत झाल्यानंतर बाळाला आईचे दूध कसे द्यावे हे समजावून सांगितले जाते तरी देखील गरोदर माता, स्तनदा माता व बालकांना पूरक पोषण आहाराचे वाटप इतक्या मोठ्या प्रमाणात होऊन देखील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी होत नाही याबद्दल समितीने आश्चर्य व्यक्त केले.

वाशिम जिल्ह्यात एका ग्रामपंचायतीचे पूरक पोषण आहाराचे देयक रूपये १५ ते १६ लाख रुपये एवढे आहे तरी देखील बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण थांबलेले नाही. एका तालुक्यात १२० ते १३० कुपोषित बालके आहेत यावरून समितीने असा निष्कर्ष काढला की, जिल्हा परिषदेतर्फे पुरविण्यात येणारा पूरक पोषण आहार एकतर बोगस आहे किंवा [पूरक पोषण आहार] तो लाभार्थी खात नाहीत किंवा [पूरक पोषण आहाराचे] त्याचे वाटप होत नाही. पूरक पोषण आहाराचे एवढ्या मोठ्या रकमेचे देयक अदा करण्यात येत असताना देखील कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात येत नसेल तर काहीही उपयोग होणार नाही त्यामुळे हा विषय अतिशय गंभीर असून या विषयी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पूरक पोषण आहाराचे धोरण शासनाच्या वरिष्ठ स्तरावर ठरविलेले असून कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी त्याची अंमलबजावणी करीत आहेत. पूरक पोषण आहाराचा करारनामा सुद्धा एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे उपलब्ध [नसतो]. त्यामुळे पंचायत समितीकडे पूरक पोषण आहाराच्या पुरवठ्याबंधातील माहिती उपलब्ध होत नाही. [कोणते साहित्य देण्यात येणार आहे किंवा दिले जाणार आहे हे ज्ञात नाही] याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. **तसेच शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याची प्रत मराठी भाषेमध्ये असून ज्या अंगणवाडी सेविकांना इंग्रजी भाषा अवगत नाही अशा [अंगणवाडी] सेविकांकरिता पूरक पोषण आहार पुरवठा करारनाम्याची प्रत [लॅटिन] इंग्रजी भाषेमध्ये आहे, ज्यामधील इंग्रजीचा अर्थबोध सुशिक्षित व्यक्तीलाही होत नाही. त्यामुळे सदर इंग्रजी भाषेमधील पूरक पोषण आहार पुरवठा करारनाम्याची प्रत मराठी भाषेमध्ये उपलब्ध करून सर्व संबंधितांना एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

विभागीय सचिवांसमवेत घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) आणि गरम अन्न (हॉट मिल) असा दोन्ही प्रकारचा आहार दिला जातो तरी देखील वाशिम जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. माहे ऑक्टोबर, २०१८ च्या विवरणानुसार वाशिम जिल्ह्यामध्ये सन २०१८ या वर्षामध्ये १ हजार ६१ बालके कुपोषित असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले नाही, अति कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी झाले नाही तसेच कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी झाले नाही, काही बालकांना पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) मिळत नाही व काही बालकांना पूरक पोषण आहार मिळत असला, तरी तो निकृष्ट दर्जाचा असावा. काही महिलांना गरोदरावस्थेच्या कालावधीमध्ये पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) मिळत नसेल, समितीने काही प्राथमिक आरोग्य केंद्राची तपासणी केली असता प्रसुती झालेल्या महिलांना गरोदर अवस्थेच्या कालावधीत पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) सेवन केला का अशी विचारणा केली असता त्यांना मुळात पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) काय आहे हेच माहित नसल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. त्यामुळे प्रस्तुत गंभीर विषयाबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागास समितीने दिल्या होत्या. परंतु विभागाने तयार केलेले उत्तर संयुक्तिक नाही, तसेच पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) जोपर्यंत खुल्या पद्धतीने चाचणी घेऊन चाचणी अहवाल प्राप्त होत नाही तो पर्यंत पूरक पोषण आहाराचा (टी.एच.आर.) वापर करता येत नाही. १५ दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असेपर्यंत दुस-या माहिन्याचा पुरवठा केला जातो असे असतानाही कुपोषण ग्रस्त बालकांची संख्या कमी होऊ शकली नाही याचा अर्थ कमी वजन असलेल्या बालकाची आई बालक जन्माला येण्यापूर्वी गर्भावस्थेमध्ये असताना पूरक पोषण आहार मिळालेला नाही. परंतु त्या महिलेला पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) दिल्याची देयके घेण्यात आली आहेत. गर्भवती मातेला पूरक पोषण आहार मिळाला असता तर निश्चितपणे सुदृढ बालक जन्माला आले असते व कुपोषित बालकांची संख्या अत्यंत कमी झाली असती यासंदर्भात समिती सूचित करते की, कुपोषणाचे प्रमाण थांबावे यासाठी अंगणवाडी मध्ये पुरविण्यात येणारा आहार बालकांना घरी मिळणा-या आहारापेक्षा उच्च दर्जाचा आहार पुरविण्यात यावा. **ज्या गरोदर महिला भगिनी स्वतःच्या घरी हलाखीच्या परिस्थितीमुळे योग्य व पोषक आहार घेऊ शकत नाही त्यांना पूरक पोषण आहाराच्या (टी.एच.आर.) माध्यमातून पूरक पोषण आहार पुरविला तरी जन्माला येणारे बालक अतिशय कमी वजनाचे असते. गरोदर महिला भगिनींचे आरोग्यकार्ड तयार करण्यात आलेले आहे. दर महिन्याला गरोदर महिला भगिनींचे वजन केले जाते व बाळाचे वजन किती वाढले आहे हे पाहिले जाते. या प्रक्रियेवरून संबंधित भगिनी पूरक पोषण आहाराचे (टी.एच.आर.) सेवन करते किंवा नाही याचा निष्कर्ष काढला जातो. परंतु त्याआधारे मूल्यमापन करण्यात येत नसल्यामुळे त्याबाबतचे अद्ययावत लेखे संबंधित जिल्हा परिषदेला सादर करण्यात यावेत. त्याचप्रमाणे समितीला भेटीच्या वेळी पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) पुरवठ्यामध्ये अनेक त्रुटी आढळल्या, या आहाराचा बालकांना लाभ होत नाही. शिवाय या आहारास अनेक बालके खातानादेखील दिसून येत नाहीत. एकूणच अनेक ठिकाणी पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) चा पुरवठा हा सदोष असल्यामुळे व तो बालकांच्या आरोग्यस देखील पोषक नसल्यामुळे व याबाबत अनेक संस्थांच्या तक्रारीदेखील असल्यामुळे पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) चा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने पुनर्विलोकन करावे व त्याऐवजी अन्य पोषक आहार देता येईल किंवा कसे याची पडताळणी करून तशाप्रकारे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

### गजानन महाराज मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील गैरसोयीबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, मंगरुळपीर या वसतीगृहाची पाहणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, वसतीगृहातील मुलांची अत्यंत गैरसोय होत आहे. मुलांना पोटभर जेवण व न्याहरी दिली जात नाही. मुलांना मोठ्या जाड व खाता न येण्यासारख्या चपात्या तसेच निकृष्ठ दर्जाचे अन्न दिले जाते. तेथील धान्यही अत्यंत निकृष्ठ दर्जाचे असून वसतिगृहातील मुलांचे कुपोषण होत आहे. अशा अनेक त्रुटी सदर वसतीगृहात आढळून आलेल्या आहेत. जिल्हा परिषद व समाजकल्याण अधिकारी यांनी या वसतीगृहातील त्रुटींबाबत शासन निर्णयाप्रमाणे कारवाई केलेली असल्याचे आढळून येत नाही. वास्तविक वसतीगृहातील वातावरण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता पोषक असले पाहिजे तसेच जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिका-यांनी तेथे दरमहा भेट दिली पाहिजे. तेथे असलेल्या त्रुटींची पूर्तता करून घेण्याची जिल्हास्तरीय अधिका-यांची जबाबदारी आहे. मात्र या अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केली आहे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करण्यात यावी तसेच गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाची मान्यता रद्द करण्यात यावी व तसा प्रस्ताव शासनाला तात्काळ पाठविण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

यावर प्रभारी समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीने भेट दिलेले गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, हे वसतीगृह बंद करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविला होता. हे वसतीगृह शासनाने बंद सुद्धा केले होते. परंतु सदरहू संस्थाचालकांनी शासनाकडे अपील केले. अपीलातून त्यांना आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली, यानंतर त्यांना पुन्हा शासन स्तरावरून सदरील वसतीगृह चालू करण्याची परवानगी मिळाली आहे. मुलांना सर्व विहीत सोयी व आहार मिळाला पाहिजे यासाठी जिल्हा परिषदेने कोणते प्रयत्न केले आहे असा समितीने प्रश्न विचारला असता प्रभारी समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्ही वसतीगृहाच्या भेटीला जातो तेव्हा शेरेबुकावर तशी नोंद करतो. सोयी सुविधांची आम्ही पाहणी करतो. यावर समितीने निदेश दिले की, सदरील वसतीगृह बंद करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने पुन्हा शासनाकडे पाठवावा. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी येथे अनपेक्षित भेट (सरप्राईज व्हिजीट) द्यावी.

वसतीगृहात कोणत्या सुविधा अपेक्षित आहे, हे शासनाने ठरवून दिलेले आहे. या वसतीगृहात निकषाप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. अनुदानित वसतीगृहास ९०० रुपये प्रती विद्यार्थी परिपोषण अनुदान प्रती माह शासन देत असते. यामध्ये वसतिगृहाने सकाळची न्याहरी, दुपारचे जेवण द्यावयास पाहिजे, याशिवाय सहायक अनुदान दिले जाते. परंतु येथील पर्यवेक्षक व समाज कल्याण अधिकारी याकडे नीट लक्ष देत नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. शासनाच्या व न्यायालयाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली पाहिजे. आतापर्यंत समाजकल्याण अधिका-याच्या निदर्शनास ही बाब का आली नाही. ही जबाबदारी समाजकल्याण अधिकारी यांचीच आहे. शासनाने वसतीगृह पुन्हा चालू करण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी ते शासनाच्या नियमानुसारच चालवायचे आहे. हे वसतीगृह नियमानुसार चालत नसेल तर समाजकल्याण अधिकारी यांनी स्वतः शासनाकडे ते बंद करणेबाबतचा प्रस्ताव पाठविला पाहिजे, असे समितीने मत व्यक्त केले.

समितीच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी टीएचआरच्या बाबत एक प्रश्न उपस्थित केला आहे. टीएचआरच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता व दिरंगाई होताना दिसत आहे. ठेकेदार एका ठिकाणी, पुरवठा वेगळ्या ठिकाणी तर गोदाम अजून वेगळ्या ठिकाणी असे असून काम करणारे तिसरेच लोक आहेत. मुलांना टीएचआर व्यवस्थित दिला जात नाही, असेच चालू राहिले तर या मुलांचे आरोग्य सुदृढ राहणार नाही. राज्यातील ब-याच जिल्ह्यात अशा घटना घडत आहेत. त्यामुळे याबाबत समिती समवेत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह ता.मंगरुळपीर, जि.वाशिम या वसतीगृहाची समितीने पाहणी केली असता असे दिसून आले की, तेथील मुलांना पोटभर जेवण,नाष्टा दिला जात नाही, मुलांची अत्यंत गैरसोय होत असून सदर वसतिगृह बंद करण्याचा प्रस्ताव शासनाकडे जिल्हा परिषदेने पाठविला होता, त्यानुसार वसतिगृह बंद करण्यात आले होते, पुन्हा शासनस्तरावरून वसतिगृह चालू करण्याची परवानगी मिळाली आहे. तथापि, वसतीगृहाची उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने सदरहु वसतिगृह बंद करण्याबाबत व त्यातील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दिनांक १७/०१/२०१८ ते १९/०१/२०१८ या कालावधीत पंचायती राज समितीच्या जिल्हा परिषद वाशिम येथील दौरा व भेटीच्या वेळी दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी अविनाश शिक्षण प्रसारक संस्था मंगरूळपीर द्वारा संचालित गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह मंगरूळपीर जिल्हा वाशिमला भेट दिली असता भेटीच्या पाहणी मध्ये तेथील मुलांना पोटभर जेवण, न्याहरी दिली जात नाही. सोयीसुविधा अपु-या असल्याचे निदर्शनास आल्यामुळे पंचायती राज समितीने दिनांक १९/०१/२०१८ रोजी जिल्हा परिषद वाशिम येथे सदर वसतीगृह बंद करण्याबाबतचा शासनाला प्रस्ताव पाठविणे बाबत सुचना दिल्या होत्या. त्यानंतर दिनांक ०२/१०/२०१८ रोजी जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी सदर वसतीगृहास भेट दिली असता वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती फारच कमी आढळली व सोयीसुविधा अपु-या आढळल्या करीता पंचायती राज समितीचे निर्देशानुसार गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह मंगरूळपीरचा बंदचा प्रस्ताव मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १७०७ दिनांक २१/१२/२०१८ रोजी सादर करण्यात आलेला आहे व सदर वसतीगृहाची मान्यता रद्द करणे बाबत या कार्यालयाकडून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :** मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम या वसतीगृहाची समितीने पाहणी केली असताना असे दिसून आले की, तेथील मुलांना पोटभर जेवण, न्याहरी दिला जात नाही, मुलांची अत्यंत गैरसोय होत असून सदर वसतीगृह बंद करण्याचा प्रस्ताव शासनाकडे जिल्हा परिषदेने पाठविला होता. त्यानुसार वसतीगृह बंद करण्यात आले होते, पुन्हा शासनस्तरावरून वसतीगृह सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. तथापि वसतीगृहाची उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने सदरहू वसतीगृह बंद करण्याबाबत व त्यातील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, सदरहू वसतीगृह बंद करण्यात आलेले आहे. त्याची मान्यता काढण्यासाठी आयुक्तांनी पूर्व परवानगी दिलेली आहे. यावर समितीने माहिती दिली की, मागील आठवडयामध्ये सातारा जिल्हा परिषदेची साक्ष घेण्यात आली होती. या वसतीगृहामध्ये मुलांना अमानवीय वागणूक, निकृष्ट जेवण दिले आहे. सातारा जिल्ह्यातील या विषयाबाबत अनेक प्रकरणे माननीय न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली होती. त्याचप्रमाणे याही वसतीगृहाबाबत प्रकरणे दाखल होणार नाहीत, याची काळजी विभाग घेणार आहे काय, यावर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, सदरहू वसतीगृह बंद करण्यात आलेले आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, वाशिम जिल्ह्यातील या वसतीगृहामधील विद्यार्थ्यांना जे खाद्य देण्यात आलेले आहे ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. सदरहू वसतीगृहाची मान्यता आता विभागाने रद्द केलेली आहे. परंतु त्या काळामध्ये या निकृष्ट धान्यासाठी जो पैसा दिला गेला आहे, तो देखील वसूल करावयास पाहिजे. त्याशिवाय अशा प्रकारांना आळा बसणार नाही.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, जर या प्रकरणी याचिकाकर्ते माननीय न्यायालयात गेले तर याबाबत न्यायालयात ठोस भूमिका मांडण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात येतील. यावर समितीने असे निदेश दिले की, शासनाची भूमिका माननीय न्यायालयामध्ये स्पष्टपणे मांडण्यासाठी जिल्हा परिषद आणि सामाजिक न्याय विभागाने घ्यावी.

**अभिप्राय व शिफारशी**

गजानन महाराज मागसवर्गीय मुलांचे वसतीगृह, ता.मंगरूळपीर जि.वाशिम येथे पंचायती राज समितीने भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, वसतीगृहातील मुलांची अत्यंत गैरसोय होत आहे, मुलांना पोटभर जेवण व न्याहरी दिली जात नाही यासंदर्भात समाज कल्याण अधिकारी यांनी केलेल्या खुलाशानुसार सदर वसतिगृह बंद करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविला होता, शासनाने वसतिगृह बंद केले होते. परंतु सदरहू संस्थाचालकांनी अपिल केले अपिलातून त्यांना आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली, यानंतर संस्था चालकांना पुन्हा शासनस्तरावरून सदर वसतिगृह चालू करण्याची परवानगी मिळाली आहे. वसतीगृहामध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या सोयीसुविधा शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नाहीत. अनुदानित वसतीगृहास परिपोषण अनुदान रूपये ९०० प्रति विद्यार्थी प्रतिमहा शासन देत असते, याशिवाय सहायक

अनुदान दिले जाते यामध्ये वसतीगृहातर्फे सकाळची न्याहरी, दोन वेळचे जेवण द्यावयास पाहिजे. समितीने सदर वसतीगृहास भेट दिली असता वसतीगृहातील मुलांना मोठ्या आकाराच्या जाड व न खाता येण्याजोग्या चपात्या देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारे निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते, न्याहरी दिली जात नाही, मेनू प्रमाणे अन्न पदार्थ स्नानाचा साबण इत्यादी दिले जात नाहीत, अन्न धान्य, खाद्यतेल इत्यादी सामुग्री निकृष्टे दर्जाची असल्याचे आढळून आले आहे. वास्तविक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता वसतीगृहामध्ये पूरक पोषण आहार उत्कृष्ट प्रतीचे धान्य मिळणे अत्यंत आवश्यक आहे. वसतीगृहामध्ये या सर्व सोयी सुविधा, पूरक पोषण आहार (टी.एच.आर.) नियमित व व्यवस्थितरित्या पुरविण्यात येत आहेत किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिका-यांची आहे. दरमहा वसतीगृहांना भेट देऊन वसतीगृहातील त्रुटींची पूर्तता करून घेणे आवश्यक असताना संबंधित अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केला आहे ही बाब अत्यंत गंभीर असल्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

राज्यामध्ये बहुतांश ठिकाणी जिल्हा परिषदेअंतर्गत असणा-या वसतीगृहांमध्ये सोयी सुविधांचा अभाव व वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. **याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या ठिकाणी वाशिम जिल्हा परिषदेतील संबंधित अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी संबंधित अधिका-यांची जबाबदारी निश्चित करावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. तसेच गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची / मुलांची प्रथम त्याच गावातील किंवा आसपासच्या दुस-या वसतीगृहात राहण्याची व खाण्यापिण्याची पर्यायी व्यवस्था करून वसतिगृहाची मान्यता रद्द करण्यात यावी व याप्रकरणी याचिकाकर्त्यानी मा.न्यायालयात अपील दाखल केल्यास त्याबाबत मा.न्यायालयामध्ये ठोस व स्पष्टपणे भूमिका मांडण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात याव्यात, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

## जिल्हा परिषदेतील गैरव्यवहाराच्या प्रकरणांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमध्ये गैरव्यवहार तसेच अफरातफरीच्या प्रकरणामध्ये किती रक्कम गुंतली होती व त्यापैकी किती रक्कम वसूल झाली आहे.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी खुलासा केला की, एकूण २३६ प्रकरणे असून त्यापैकी १०५ प्रकरणांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये रुपये ३६,८४,५६०/- इतकी रक्कम गुंतलेली असून चौकशीअंती रुपये ३१,९५,९१५/- इतकी रक्कम समायोजित केली आहे. चौकशी अंती वसूलपात्र रक्कम रुपये ४,९५,९१५ असून त्यापैकी रुपये २,५०,१२०/- इतकी रक्कम वसूल केली आहे. रुपये २,४५,७९५/- इतक्या गुंतलेल्या रकमेतील तत्कालिन सचिव मयत असून ही रक्कम वसूल झालेली नाही.

यावर समितीने विचारणा केली की, एखादा कर्मचारी मयत झाला किंवा त्याने आत्महत्या केली अशा प्रकरणात कायद्यानुसार वसूलीच्या संदर्भात कोणती कारवाई करता येते. शासन निर्णयात काही तरतूद आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वारसांवर बोजा चढविणे योग्य होणार नाही. सदर बाबतीत माहिती घेऊन सांगावी लागेल. बोजा चढविण्याची कार्यवाही करतो.

यावर समितीने मत व्यक्त केले की, कर्ज असणा-या शेतक-याने आत्महत्या केली तर त्याचे कर्ज माफ होत नाही, शासन आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबाला मदत करते, त्याचे कर्ज माफ करण्यासाठी काहीही करीत नाही. एखाद्या शेतक-याची चौकशी असेल तरी त्याच्या ७/१२ वर त्याची नोंद केली जाते. पुढे समितीने असे निदेश दिले की,सदर विषयाच्या संदर्भात कारवाई करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वाशिम जिल्हा परिषदेत गैरव्यवहाराची एकुण २३६ प्रकरणे असुन त्यापैकी १०५ प्रकरणांचा तपासणीमध्ये रूपये ३,६८,८४,५६०/- एवढी रक्कम गुंतलेली आहे,चौकशी अंती वसुलपात्र रक्कम रुपये ४,९५,९१५/- एवढी असुन त्यापैकी रू.२,४५,७९५/- एवढी रक्कम सचिव मयत असल्याने वसुल होणे बाकी आहे, उर्वरीत प्रकरणांमधील वसुलीची रक्कम तसेच सचिव मयत असल्याने प्रलंबित वसुलीची रक्कम वसुल होण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणा दरम्यान अर्धसमास पत्र क्रं.-४ दिनांक १९/०९/२०१६ अन्वये सन २०१५-१६ अखेर ग्रामपंचायत प्रलंबीत अफरातफर प्रकरणांची माहिती मागीतली असता खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

| १/४/१५ सुरुवातीची शिल्लक प्रकरणे | गुंतलेली रक्कम | निकाली काढलेली प्रकरणे | गुंतलेली रक्कम | समायोजित केलेली | वसुल केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २३६ | १,२१,१४,१६९ | १०५ | ३६,८४,५६० | ३१,८८,६४५ | २,५०,७९५ |

(१) ०१/०५/२०१५ रोजी २३६ प्रकरणे होती या २३६ प्रकरणामध्ये गुंतलेली एकूण रक्कम रूपये १,२१,१४,१६९/- इतकी होती.

(२) जानेवारी २०१८ पर्यंत २३६ प्रकरणा पैकी १०५ प्रकरणे निकाली काढण्यात आली होती. या १०५ प्रकरणामध्ये लेखापरिक्षण अहवालानुसार एकुण गुंतलेली रक्कम रू.३,६८,८४,५६०/-इतकी दर्शविली होती. गुंतलेली रक्कम रू. ३,६८,८४,५६०/- इतकी नसुन रू.३६,८४,५६०/- आहे. चौकशी अंती रूपये ३१,८८,६४५/- इतकी रक्कम समायोजित करण्यात आली होती.तर रू.४,९५,९१५/- एवढी रक्कम वसुलपात्र रक्कम म्हणुन निश्चित करण्यात आली होती त्यापैकी रू.२,५०,१२०/- एवढी रक्कम संबधीता कडुन वसुल करण्यात आली आहे तसेच रू.२,४५,७९५/- ही रक्कम तत्कालिन सचिव श्री पी. एस. राऊत हे दि. ३०.०४.२००५ या तारखेस नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले होते. ग्रामपंचायत निधीचे लेखा परिक्षण दि. १९.०४.२०१० ते २३.०४.२०१० झाले. त्या बाबत लेखापरिक्षण अहवाल दिनांक १८.०३.२०११ ला प्राप्त झाला आहे.

श्री पी. एस. राऊत हे दि. ०२.०५.२०१० रोजी मयत झाल्यामुळे चौकशी करून अपहारीत रक्कम वसुल करणे शक्य नसल्याने सदर रक्कम निर्लेखित करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) डिसेंबर २०१८ पर्यंत २३६ प्रकरणांपैकी उर्वरीत १३१ प्रकरणामधील ५७ प्रकरणे चौकशी अंती निकाली काढण्यात आली आहेत रू.२,५६,३०७/- एवढी रक्कम गुंतली असुन यापैकी रू.७७८/- एवढी रक्कम समायोजित करण्यात आली असुन उर्वरित रू.२,५५,५२९/- एवढी वसुलपात्र रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(४) सद्यःस्थितीत २३६ पैकी एकुण १६२ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असुन उर्वरीत ७४ प्रकरणांवर (रक्कम रू.८४,२०,४६४/-) निकाली काढण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश सर्व गविअ यांना देण्यात आलेले असून त्यासंबंधात कार्यवाही करण्यात येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :** (वित्त-७) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, वाशिम जिल्हा परिषदेतील गैरव्यवहासंदर्भातील विषयाबाबत समितीला माहिती देण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, इतर सर्व प्रकरणामध्ये कारवाई सुरू आहे.

याबाबत एक आदेश काढण्यात आलेला आहे. शून्य ते एक हजार रुपयांपर्यंतच्या गैरव्यवहासाठी एक ठपका ठेवण्यात आलेला आहे. एक हजार ते दहा हजार रूपयांपर्यंतच्या गैरव्यवहारासाठी एक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे आणि दहा हजार रूपयांच्या पुढील गैरव्यवहारासाठी दोन वेतनवाढी रोखण्यात येत आहेत. विस्तार अधिका-यांच्या दोन-दोन वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या आहेत. सदरहू प्रकरण निकाली काढण्यात येत आहे. यावर समितीने निदेश दिले की, यामधील पैशांची वसुली देखील झाली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

सन २०१३-१४ या वर्षाच्या वाशिम जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, वाशिम जिल्हा परिषदेमध्ये गैरव्यवहार तसेच अफरातफरीच्या २३६ प्रकरणांपैकी १०५ प्रकरणे निकाली काढण्यात आली होती. या १०५ प्रकरणामध्ये लेखा परिक्षण अहवालानुसार रू. ३६,८४,५६०/- एवढी रक्कम गुंतलेली असून रू.३१,८८,६४५/- एवढी रक्कम समायोजित करण्यात आली होती. तर रू. ४,९५,९१५/- एवढी वसुलपात्र रक्कम निश्चित करण्यात आली होती त्यापैकी रू.२,५०,१२०/- एवढी रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रू.२,४५,७९५/- तत्कालिन सचिव, श्री. पी.एस.राऊत यांचेकडून वसूल करणे शक्य झाले नाही कारण श्री.राऊत दिनांक ३० एप्रिल, २००५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले होते व ग्रामपंचायत निधीचे लेखा परिक्षण दिनांक १९ एप्रिल,२०१० ते २३ एप्रिल २०१० या कालावधीमध्ये झाले व लेखा परिक्षण अहवाल दिनांक १८ मार्च, २०११ रोजी प्राप्त झाला. तथापि, श्री.राऊत दिनांक २ मे, २०१० रोजी मयत झाल्यामुळे अपहारित रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने सदर रक्कम निर्लेखित करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्तांमार्फत सादर करण्यात येत आहे. उर्वरित १३१ प्रकरणांमधील ५७ प्रकरणे चौकशीअंती निकाली काढण्यात आली असून गुंतलेली रक्कम रू.२,५६,३०७/-यापैकी रू.२,५५,५२९/- एवढी वसुलपात्र रक्कम वसुल करण्यात आली आहे व रू.७७८/- एवढी रक्कम समायोजित करण्यात आली आहे.

सद्यःस्थितीत २३६ प्रकरणांपैकी १६२ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून उर्वरित ७४ प्रकरणांवर रक्कम रू. ८४,२०,४६४/- निकाली काढण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता समितीच्या मते अपहार अथवा गैरव्यवहार केलेला एखादा कर्मचारी मयत झाला किंवा त्याने आत्महत्या केल्यास कायद्यानुसार अपहारित रक्कम वसुली संदर्भात कारवाई करण्यात यावी. **तसेच उर्वरित ७४ प्रकरणांमधील अपहारित / गैरव्यवहारामध्ये गुंतलेली रक्कम रू.८४,२०,४६४/- वसुल करण्यासाठी संबंधित गटविकास अधिका-यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, व उक्त रक्कम लवकरात लवकर वसूल करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, वाशिम (प्रशासन)

### वाशिम जिल्हा परिषदेमध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येणा-या उपाययोजनासाठी वाढीव निधीची तरतूद करण्यात न आल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१८ या कालावधित वाशिम जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, मागील ३ वर्षांतील जिल्ह्यातील दूध संकलनाची दैनंदिन सरासरी कशी होती, त्यामध्ये वाढ करण्यासंदर्भात विभागाने कोणती कार्यवाही केली अथवा कोणते कार्यक्रम हाती घेतले आहेत, अहवाल वर्षात दुभते जनावर गट वाटप करण्याकरिता ८४ चे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते, वाशिम जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक राज्यात सर्वात शेवटी असूनही एवढे कमी उद्दिष्ट जिल्ह्यात का प्राप्त झाले होते, योजनेची माहिती विशद करून अहवाल वर्षात कोणती कार्यवाही केली, त्या संदर्भातीलही माहिती सांगावी.

यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, ७५ टक्के अनुदानावर २ दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात येते. सदर वर्षात ८४ चे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी ४८ लाख रुपये तरतूद प्राप्त झाली होती. त्यामधून ८४ लाभार्थ्यांना लाभ दिला होता. १०० टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. एका लाभार्थ्याला २ गुरांचा लाभ दिला आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपल्याकडे लाभार्थ्यांची यादी आहे का, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस लाभार्थ्यांची यादी सादर करण्यात येईल असे उत्तर दिले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मागणीपेक्षा कमी तरतूद प्राप्त होण्याचे कारण काय आहे, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, मागणी कमी होती. यावर समितीने विचारणा केली की, कमी मागणी करण्याचे कारण काय, मागणी कधीही जास्त असली पाहिजे. या समितीमध्ये कोण असते, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर योजना २०११-२०१२ पासून सुरु झाली, त्यापुढील वर्षात जास्त मागणी केलेली आहे. याकरिता शासन निर्णयाप्रमाणे निवड समिती असते. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे अध्यक्ष असतात. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सदस्य असतात. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे सदस्य सचिव असतात.

यावर समितीने मत व्यक्त केले की, वाशिम जिल्हा मानव विकास निर्देशांकाप्रमाणे राज्यातील शेवटच्या क्रमांकावर असणारा जिल्हा आहे. गरीब व आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. यांना मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे. त्यासाठी उपायोजना करण्यात याव्यात. याबाबत शासनाचे काही निदेशसुद्धा आहेत. असे निदेश असताना आपण कमी तरतूद करणे, कमी मागणी करणे हे संयुक्तिक नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-२०१३ मध्ये जास्त मागणी केलेली होती अशी माहिती आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, या जिल्ह्यामध्ये दरडोई उत्पन्न कमी आहे, हे येथील अधिका-यांनी लक्षात घ्यावे व त्याप्रमाणे जिल्ह्याच्या विकासासाठी काम करावे. खातेप्रमुखांनी मानव विकास निर्देशांक लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) ला प्रस्ताव द्यावेत. जिल्हा वार्षिक योजनेचे जिल्हा नियोजन अधिकारी हे वेगळे पद आहे. मानव विकास निर्देशांकाकरिता वेगळा जिल्हा नियोजन अधिकारी विभाग आहे. दरडोई उत्पन्न वाढविण्याकरिता त्या भागात स्वयंरोजगाराच्या संधी त्या त्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात याव्यात. ज्यांच्याकडे उत्पन्नांची कमी साधने आहेत, त्यांचा स्वतःचा खर्च कमी करण्यात यावा. त्यांना आरोग्य, शिक्षण, बस सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात याव्यात. या सुविधा त्यांच्या पर्यंतपोहचतात की नाही याचे संनियंत्रण करण्यासाठी गट विकास अधिका-याचे पद आहे. गटविकास अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करावी. रेड झोनमध्ये असलेल्या गावांना कसे बाहेर काढता येईल, तेथे किती गरीब कुटुंबे आहेत याचा कधी विचार केला आहे का, या सर्व बाबींचा विचार करून तुम्हाला जिल्हा नियोजन अधिकारी (डीपीओ) कडे याचा प्रस्ताव सादर करावयाचा आहे. जिल्हा परिषदेने याबाबत दिलेली आकडेवारी समितीस बोगस वाटत आहे. याकरिता यशदा या संस्थेमध्ये विविध वर्ग चालविले जातात, जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी प्रशिक्षण घेतले असेल असे समितीस वाटते.

पशुसंवर्धन विभागाचा विषय महत्वाचा आहे. कृषी व पशुसंवर्धन विभागाबाबत लेखा आक्षेपही आहेत. वाशिम जिल्हा मानव विकास निर्देशांकात शेवटचा आहे. आदिवासी, मागासवर्गीय, बंजारा व ओबीसी समाजातील अत्यंत गरीब लोक या जिल्ह्यात आहेत. येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. सिंचनाच्या सोयी कमी आहेत. मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांकरिता वेगळे शासन परिपत्रक आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्याकरिता जास्त योजना व जास्त निधी मिळू शकतो. यातून कृषी, समाजकल्याण, पशुसंवर्धन विभागाकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच इतरही महत्वाच्या विभागाकडे लक्ष दिले पाहिजे. याकरिता जिल्हा परिषदेने वेळोवेळी निधीची मागणी करणारे वेगवेगळे प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. सन २०१३-२०१४ मध्ये पुरेसा निधी नाही व पुरशी कामेही झालेली नाहीत, त्यावेळी जास्त निधीची मागणी केलेली नाही. वाशिम जिल्ह्याचा विकास करावयाचा असेल व येथील गरिबांचा आर्थिक स्तर उंचावयाचा असेल तर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची आहे, याकरिता संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वाशिम जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक राज्यात सर्वात शेवटी असुनही दूध संकलनाचे कमी उद्दिष्ट प्राप्त होण्याचे कारणे काय आहेत. तसेच, वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे योजना अंमलबजाणीसाठी कोणती उपाययोजना / कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

वाशिम जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सन २०११-१२ मध्ये झालेल्या गणनेनुसार राज्यात ३२ वा क्रमांक आहे.

वाशिम जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ होण्याचे दृष्टीकोनातून पशुसंवर्धन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

वाशिम जिल्ह्यात २०१२ च्या पशुगणनेनुसार दुधाळ जनावरांची संख्या संकरित गाई-२३०९, देशी गाई-३७२३२, म्हैस २५४०७ असे एकूण ६४९४८ आहे.

वाशिम जिल्ह्यात सन २०१२-१३ मध्ये दैनिक सरासरी दूध संकलन २००२ लिटर व वार्षिक ७३०७७१ लिटर होते. पुढील वर्षात ३ वर्षांत खालीलप्रमाणे दुधाचे उत्पादनात वाढ झालेली आहे.

| अ.क्र. | सन | दैनिक सरासरी (लि) | वार्षिक उत्पादन (लि) |
|---|---|---|---|
| (१) | २०१३-१४ | २१७१ | ७९२४२७ |
| (२) | २०१४-१५ | २४७६ | ९०३७३१ |
| (३) | २०१५-१६ | २६४८ | ९६६३५० |

वर दिलेली दूध उत्पादनाची आकडेवारी फक्त दूध संकलन केंद्रावर संकलीत झालेल्या दूधाची असून ग्रामीण भागातील व शहरी भागातील पशुपालक मोठ्या प्रमाणात दूध खाजगी मिठान्न भांडार व खाजगीत घरोघरी विक्री करतात. त्यामुळे दूध संकलनाची आकडेवारी कमी दिसते.

पशुसंवर्धन खात्यामार्फत विविध योजने अंतर्गत खालीलप्रमाणे वर्षनिहाय दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात आले आहे.

| अ.क्र. | वर्ष | जिल्हा स्तरीय वि.घ.यो व ओ.टी.एस.पी.योजना | नाविण्य पूर्ण योजना | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | २०१२-१३ | १०० | १६० | २६० |
| (२) | २०१३-१४ | १४८ | १६० | ३०८ |
| (३) | २०१४-१५ | १४८ | १५८ | ३०६ |
| (४) | २०१५-१६ | १४८ | १५६ | ३०४ |
| (५) | २०१६-१७ | १९० | १६० | ३५० |

तसेच वर्ष निहाय झालेली कृत्रिम रेतने खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ष | गाय वर्ग | म्हैस वर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | २०१२-१३ | ५०३३ | ५१३८ | १०१७१ |
| (२) | २०१३-१४ | ५५१० | ५२०९ | १०७१९ |
| (३) | २०१४-१५ | ५४७६ | ४८५३ | १०३२९ |
| (४) | २०१५-१६ | ५८४२ | ४६१३ | १०४५५ |
| (५) | २०१६-१७ | ६०२२ | ५२७१ | ११२९३ |

जिल्ह्यात दूध उत्पादनामध्ये वाढ होण्याचे दृष्टीने विभागामार्फत इतर योजना व पशुवैद्यकीय सेवा जसे वैरण बियाणे वाटप, दुधाळ जनावरांना पशुखाद्य पुरवठा,कामधेनू दत्तक ग्राम योजना व जनावरांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी जंतनाशक औषधी पाजने, क्षार मिश्रण पुरवठा करणे, रोगप्रतिबंधक लसीकरण करणे, उच्च जातीच्या वळूचे विर्य वापरुन कृत्रिम रेतनाद्वारे जास्त दूध देणारी जनावरे निर्माण करणे इत्यादी सेवा प्रभावीपणे देण्यात येत असल्यामुळे जिल्ह्यात दूध उत्पादनात वाढ झालेली आहे.

वरीलप्रमाणे मानव विकास निर्देशांक वाढविण्याचे दृष्टिने पशुसंवर्धन विभागामार्फत उपाय योजना करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषि व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे अभिप्राय :-** सन २०१२-१३ मध्ये वाशिम जिल्ह्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर ०२ दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे या योजनेअंतर्गत एकूण ८४ लाभार्थ्यांचे उद्दिष्ठ देण्यात आले होते, तथापि, प्राप्त तरतुदीच्या अधीन राहून एकूण ५० लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी ०२ याप्रमाणे एकूण १०० जनावरांचे वाटप करण्यात आलेले आहे. सन २०१३-१४ पासून जिल्ह्यासाठीचे उद्दिष्ट वाढविण्यात आलेले असून, सन २०१६-१७ मध्ये १९० जनावरांचे वाटप करण्यात आलेले आहे.

उपरोक्त योजनेव्यतिरिक्त वाशिम जिल्ह्यामध्ये दुग्धव्यवसायास चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत ०६/०४/०२ दुधाळ जनावरांचे गट वाटप, शेतक-यांच्या क्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी १०० टक्के अनुदानावर वैरण बियाणे व ठोंबांचा पुरवठा करणे, कामधेनू दत्तक ग्राम योजना, संकरित कालवडी व म्हशींच्या पारडयांसाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम, दुभत्या जनावरांना क्षारमिश्रणांचा व जंतनाशकांचा पुरवठा, विविध रोग प्रतिबंधक लसीकरण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुट पालन विषयक प्रशिक्षणाच्या योजना राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील गाई-म्हशीं मध्ये अनुवंशिक सुधारणा करून दुध उत्पादकता वाढविण्यासाठी उच्च प्रतीच्या गाय व महीष वर्गाचे विर्य वापरून कृत्रिम रेतनाची सुविधा सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच, राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतक-यांच्या दारात त्यांचेकडील गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मे.जे.के.ट्रस्ट, ठाणे या सेवाभावी संस्थेची कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या निदर्शनास आले की, पशुसंवर्धन विभागातर्फे ७५ टक्के अनुदानावर २ दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात येते. सन २०१२-१३ या वर्षात ८४ लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी ४८ लाख रूपयांची तरतूद प्राप्त झाली होती. १०० टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. एका लाभार्थ्याला २ दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात आले. वाशिम जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे तसेच सन २०११-१२ मध्ये झालेल्या जणगणनेनुसार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक राज्यात ३२ व्या क्रमांकावर आहे. आदिवासी, मागासवर्गीय, बंजारा व ओबीसी समाजातील अत्यंत गरीब लोक या जिल्ह्यामध्ये वास्तव्यास आहेत या जिल्ह्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस पडतो तसेच सिंचनाच्या सोयी देखील कमी आहेत. मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांकरीता वेगळे शासन परिपत्रक आहे त्यामुळे वाशिम जिल्ह्याकरीता जास्त निधी प्राप्त होऊ शकतो. तथापि, सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पशुसंवर्धन विभागातर्फे विविध योजनांतर्गत करण्यात आलेल्या दुधाळ जनावरांच्या गट वाटप योजनांतर्गत ८४ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. तथापि, प्राप्त तरतूदींच्या अधिन राहून केवळ ५० लाभार्थ्यांना प्रतिलाभार्थी २ या प्रमाणे एकूण १०० जनावरांचे वाटप करण्यात आले आहे असे मंत्रालयीन विभागाच्या अभिप्रायामध्ये स्पष्टपणे नमुद असताना वाशिम जिल्हा परिषदेच्या प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी मात्र सदर वर्षात ८४ लाभार्थ्यांना लाभ दिला असल्याची चुकिची माहिती समितीला दिल्यामुळे समितीची एक प्रकारे दिशाभूल केल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**जिल्ह्यातील अत्यंत गरीब, गरजू व होतकरू लोकांना दुभते जनावर गट वाटप योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले आहे. हे टाळण्यासाठी जिल्हा परिषदेने वेळोवेळी निधीची मागणी करणारे वेगवेगळे प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ मध्ये देखील पुरेसा निधी व पुरेशी कामे झालेली नसतानाही त्यावेळी जिल्हा परिषदेकडून शासनाकडे जास्त निधीची मागणी केलेली नाही त्यामुळे समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. वाशिम जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करावयाचा असेल आणि गरीबांचा अर्थिक स्तर उंचावयाचा असेल तर पशुसंवर्धन,कृषी, समाजकल्याण विभागाच्या विविध योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने वेळोवेळी निधीची मागणी करणारे वेगवेगळया प्रस्तावांना मंजुरी घेऊन त्याची सक्षमरित्या अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व संबंधित विभागाच्या विभागप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करावी. तसेच, वस्तुतः ज्या जिल्ह्यांमधील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे अशा जिल्ह्यांमध्ये विकासाच्या विशेष योजना राबविणे अत्यंत गरजेचे असल्याने शासनाने या जिल्ह्यांबाबत प्राथम्याने विचार करून सदर योजनांची अंमलबजावणी करावी, अशी समितीची शिफारस आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

# परिशिष्ट—समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १७ जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**जिल्हा परिषद, पदाधिकारी**

(१) श्रीमती हर्षदा देशमुख, अध्यक्षा, जिल्हा परिषद, वाशिम

(२) श्री चंद्रकांत ठाकरे, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, वाशिम

(३) श्रीमती छाया पाटील, सभापती, पंचायत समिती, रिसोड

(४) श्रीमती पानुबाई जाधव, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, वाशिम

(५) श्रीमती यमुनाबाई जाधव, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, वाशिम

(६) श्री. विकास गवळी, सदस्य, जिल्हा परिषद, वाशिम

(७) श्रीमती ज्योती गणेशपुरे, सदस्या, जिल्हा परिषद, वाशिम

(८) श्रीमती धनश्री राठोड, सभापती, पंचायत समिती, मानोरा

(९) श्रीमती मंगलाताई गवई, सभापती, पंचायत समिती, मालेगांव

(१०) श्रीमती वर्षाताई नेमाने, सभापती, पंचायत समिती, कारंजा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

(२) श्री. जी. एस. भगत, सहायक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय कापडणीस, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) डॉ. डी. एस. सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी

(८) श्री. ए. एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) डॉ. ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. व्ही. बी. गहेरवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)

(१४) श्री. मी. चु. उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१५) डॉ. जे. पी. केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. व्ही. एम. कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)

(१७) श्री. एस. आर. कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव

(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(२०) श्री. एन. टी. खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर

(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड

(२२) श्री. डी. बी. पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

(२३) श्री. आर. ओ. वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम

(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१२-२०१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील वाशिम जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १८ जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(८) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(११) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

(२) श्री. जी. एस. भगत, सहायक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय कापडणीस, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) डॉ. डी. एस. सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी

(८) श्री. ए. एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) डॉ. ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. व्ही.बी.गहेरवार, कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग)

(१४) श्री. मी. चु. उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१५) डॉ. जे. पी. केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. व्ही. एम. कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)

(१७) श्री. एस. आर. कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव

(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(२०) श्री. एन. टी. खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर

(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड

(२२) श्री. डी.बी.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

(२३) श्री. आर.ओ.वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम

(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात वाशिम जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी २४९५—६ (४५०—६—२०१९)

**शुक्रवार, दिनांक १९ जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा.

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक, (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय.

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

(२) श्री. जी.एस. भगत, सहाव्यक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग.

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय कापडणीस, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) डॉ. डी. एस. सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी

(८) श्री. ए. एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) डॉ. ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. व्ही. बी. गहेरवार, कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग)

(१४) श्री. मी. चु. उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१५) डॉ. जे. पी. केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. व्ही. एम. कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)

(१७) श्री. एस. आर. कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव

(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(२०) श्री. एन. टी. खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर

(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड

(२२) श्री. डी. बी.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

(२३) श्री. आर. ओ. वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम

(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील वाशिम जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक.

**विभागीय सचिव**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग

(३) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(४) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(५) श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

(६) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(७) श्री. फु. स. मेश्राम, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(८) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(९) श्री. सु. नि. गावडे, सह सचिव, वने (भूसंपादन) विभाग

(१०) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(११) डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग

(१२) श्री. विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१३) डॉ. एस.एस.पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१४) श्री. अ. प्र. अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. दिपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(२) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, वाशिम

(३) श्री. जी. व्ही. जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(४) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वाशिम

(५) डॉ. आली आर खान, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(६) श्री. एन. एन. मोहुर्ले, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(७) श्री. विजयसिंह गहेरवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, वाशिम

(८) श्री. अभिषेक देशमुख, उपविभागीय अधिकारी, वाशिम

(९) श्री. जी. एस. डाहोरे, नायब तहसीलदार, वाशिम

(१०) श्री. सुनिल खमितकर, जि. रा. क. अ., जिल्हा परिषद, वाशिम.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, वने (भूसंपादन) विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २२ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(५) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) श्री. सुभाष गावडे, सह सचिव, (भूसंपादन), महसूल व वन विभाग

(५) डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव रोजगार हमी योजना

(६) श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(८) श्री. बा. की. रासकर, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(९) डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१०) श्री. अ. प्र. अहिरे, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(११) श्री. नि. ग. सोनलसकर, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम :**

(१) श्री. दीपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(२) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, वाशिम

(३) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वाशिम

(४) श्री. व्ही. व्ही. जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(५) श्री. नितीन मोहुर्ले, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(६) श्री. सुभाष अवचार, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(७) डॉ. आय. एस. खान, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(८) श्री. विजयसिंह गहेरवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, वाशिम

(९) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव (भूसंपादन), महसूल व वन विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.

(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१२) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(१३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत चोवीसाव्या व पंचवीसाव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई